मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

निबंध : ६८ - सन १८६९

ले. कृष्णशास्त्री चिपळूणकर

पु : लोकभ्रम

( श्री प्रिंटर्स अँण्ड स्टेशनर्स, ठाणे )

सं. क्र.

लोकभ्रम.

निबंध

( कृष्णशास्त्री चिपळोणकरकृत )

निबंधमालेंतील

# लोकभ्रम

हा निबंध

लोकोपयोगार्थ छापून प्रसिद्ध केला आहे.

---

निबंध
सन १८८२

मुंबई

इंडिअन प्रिंटिंग प्रेस.

---

सन १८९२.

---

किंमत चार आणे.

( निबंधमाला—अंक १२ वा. )

# लोकभ्रम.

सांगों जाणों शकुन । भूतभविष्यवर्तमान ॥
[illegible]ासि कंटाळा । पाहों नावडती डोळां ॥ तुकाराम.

या निबंधांत आपल्या लोकांत आज फार दिवसांपासून जीं कित्येक खुळें माजलीं आहेत त्यांविषयीं लिहावयाचें आहे. हीं खुळें ह्मणजे भुतेंखेतें, शकुन, मंत्र, ग्रहांचे शुभाशुभ योग, दैव, नवस, किमया, रमल इत्यादि होत. यांवर बहुतेक लोकांचा विश्वास असल्यामुळें लबाडांस फावून लोकांचें फार नुकसान होतें. एक तर हे सर्व निवळ भ्रांतीचे प्रकार असल्यामुळें हे मनास जडले असतां त्यास क्षीणत्व येतें. शिवाय काळाचा, श्रमाचा, व पैशाचा विनाकारण खर्च होतो. असो, तर याविषयीं आतां क्रमाक्रमानें विचार करूं.

२. पहिल्यानें भुतेंखेतें.–अगदीं प्राचीन काळापासून मनुष्यमात्राचा असा एक समज होऊन गेला आहे कीं, मनुष्याचे मरणसमयीं त्याचे दोन भाग जे चित् आणि जड, ह्मणजे आत्मा आणि शरीर, यांचा जो वियोग होतो तो झाल्यानंतरही ज्या ठिकाणीं मेलेल्या माणसाची आशा गुंतून राहिली असते तेथें त्याचा आत्मा पिशाचरूपानें भ्रमण करतो. हा समज मनुष्यमात्राच्या मनास बहुधा खिळून गेला आहे; इतका कीं, ज्यानें अशा प्रकारच्या कांहीं तरी गोष्टी ऐकल्या नाहींत असा साऱ्या पृथ्वीवर एकही मनुष्य सांपडायाचा नाहीं. आडिसननें* एके ठिकाणीं

*आडिसनच्या 'स्पेक्टेटर' मध्यें प्रकृत विषयावर एक शानदार निबंध आहे तो आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच.

मौजेनें ह्मटलें आहे, कीं ' ज्यांत भूत नाहीं असें इंग्लंडांत एकही गांव किंवा खेडें नाहीं; ' हेंच त्याचें ह्मणणें पृथ्वीवरील एकंदर शहरांस, गांवांस, व खेड्यांसही लागेल. आमच्या देशांत भुतें, समंध, ब्रह्मसमंध, हाडळी, डाकिनी, मुंजे, पैशाच्या डबोल्यावर बसलेले रक्षक नाग, यांविषयीं लोकांनीं सांगितलेल्या गोष्टी कोणीं ऐकल्या नाहींत? तसेंच अमुक अमुक वाड्यांत समंध आहे, तो कोणास आंत नांदूं देत नाहीं, अशा प्रकारच्या लोकवार्तांवरून ओसाड पडलेलीं ठिकाणेंही कोणास माहीत नाहींत? पण पिशाचादिकांचा मुख्य आखाडा ह्मटला ह्मणजे मसणवटींत. तेथें त्यांच्या क्रीडा, चेष्टा, वेताळाची स्वारी* वगैरे सर्व यथास्थित दृष्टीस पडायाचें! भवभूतीच्या ' मालतीमाधव ' नाटकाच्या पांचव्या अंकाच्या आरंभीं हा सर्व प्रकार फार उत्कृष्ट रीतीनें वर्णिलेला आहे. तो आमच्या असंस्कृतज्ञ वाचकांसही त्या नाटकाच्या मराठी भाषांतरांत वाचतां येईल. असो; तर स्मशान हें पिशाचादिकांचें मुख्य वसतिस्थान. यांचें कारणही उघडच आहे कीं, सारीं प्रेतकर्में तेथेंच होत असल्यामुळें त्या स्थळाच्या दर्शनानें किंवा स्मरणानें दुसरी कल्पना मनांत येतच नाहीं. यास्तवच कोणास भुतें दाखवावयाचीं असतां देवरुखे वीरमंत्री वगैरे लुच्चे लोक भोळ्या लोकांस तेथेंच नेऊन फसवतात. भुतें दिवसां दिसायाचीं नाहींत, तीं रात्रीं मात्र दिसायाचीं; त्यांतून काळोख्या रात्रीं विशेषतः अवसेस; हे समज लोकांचे आयतेच ठरले असल्यामुळें त्यांच्या पथ्यावर फार पडतात. कां कीं, काळोख्या रात्रीं अंधारांत भुतें दाखविण्याची तयारी त्यांस सर्व अगोदर कोणास न कळतां करतां येतें. ती तयारी ह्मटली ह्मणजे अर्थातच

* हा प्रकाश मसणवटींत, रानांतील दलदलीत वगैरे दिसतो. याचें कारण अजून बरोबर समजलें नाहीं. प्राण्यांचीं शरीरें व वनस्पति हीं कुजत पडलीं असतां त्यांतून निघणारा एखादा ज्वालामाही वायु ( ग्यास ) हा असावा असें ह्मणतात. याची मौज अशी सांगतात कीं, यांत पुष्कळ ज्योती हवेंत तरंगता- हेतशा दिसून त्यांच्याजवळ जसजसें जावें तसतशा त्या दुरदूर जातात. हा प्रकार मनुष्य चालू लागला असतां मध्यरात्रीच्या निश्चल हवेंत त्याच्या चालण्यानें ज्या लाटा होतात त्यांच्या योगानें होतो. याचें ल्याटिन नांव ' इग्निस् फ्याट्यूई ' ( फसवणारा प्रकाश ) असें आहे. इंग्रेजींतील तर मराठींतल्या सारखींच आहेत:—' विल् ऑफ् दि विस्प्, ' ' जाक विथ् दि लांटर्न् ' ( कोलीत किंवा कंदील घेतलेला जोशा )!

जिवंत आशाळभूत भुतें तेथें अगोदर नेऊन ठेवून त्यांच्याकडून खऱ्या भुतांच्या सर्व चेष्टा करून दाखवायाच्या. त्यांतून तो भुतवाला पाहणारास दूर उभें करून ताकीद देत असतो कीं, पहा जर जवळ जाल तर भूत गचांडी धरील! याप्रमाणें त्यांचे सर्व कात्रे अगोदरपासून बनवलेले असतात. पण त्यांतूनही जर तसाच कोणी वस्ताद भेटला, तर वेळेनुसार त्यांची फजीतीही होते. असो; याप्रमाणेंच कोणास मंत्रसाधन करून घेणें असतां तेंही स्मशानावांचून होत नाहीं.† कोणी नादिष्ट लोक गारुड्याच्या मागें लागले असतां तो त्यांस मध्यरात्रीं मसणवटींत फिरवतो, आणि पुरलेल्या व जाळलेल्या माणसांच्या कवटया, हाडें वगैरे जमा करण्याच्या नादीं लावून त्यांस वरचेवर भुलथापा देत असतो. शेवटीं यांपासून आतां जास्त कांहीं लभ्य नाहीं असें पाहून एकादे दिवशीं निसटून जातो म्हणजे झालें. असो; तर यासारख्या अनेक प्रकारांनीं 'दुनिया झुकती है' या म्हणीप्रमाणें भोळ्या लोकांवर लबाडांचा चरितार्थ चालत आहे.

३. आतां भुतांविषयीं वगैरे लोकांच्या ज्या अनेक कल्पना आहेत, त्यांतील तथ्य पाहूं. पहिल्यानें त्यांचें अस्तित्व, म्हणजे तीं आहेत कीं नाहींत याविषयीं.

४. कोणत्याही गोष्टीच्या खरेपणाविषयीं खात्री होण्यास तीन प्रकार लागतात. एक तिची स्वतःची संभाव्यता, दुसरें प्रत्यक्ष प्रमाण, तिसरें विश्वासपात्र मनुष्याचें भाषण किंवा लेख. आतां भुतेंखेतें दृष्टीस पडणें हें संभवतें कीं नाहीं याचा अगोदर विचार करूं. भूत म्हणजे काय याची जर कल्पना मनांत आणली तर ती अर्थात् हीच कीं, शरीरास सोडून गेलेला आत्मा. तेव्हां भूत म्हणजे तो आत्मा होय; इंद्रियगोचर जें जड शरीर तें नव्हे हें अर्थातच झालें. मरणसमयीं जें नष्ट झालें तें तो आत्मा होय; जड शरीर हें पहिल्यासारखें कायमचें कायमच असतें; त्याची मरणोत्तर काय व्यवस्था होते ती तर सर्वांस दिसतेच. तर मग या दहन पावलेल्या किंवा पुरून टाकलेल्या शरीरासहवर्तमान तो नष्ट झालेला

---

† भर्तृहरीनें लिहिलें आहे:—'मंत्राराधनतत्परेण मनसा नीताः स्मशाने निशाः' (मंत्राराधन करण्याच्या हेतूनें रात्रीं मसणवटीं हिंडलों.) यावरून स्पष्ट दिसतें कीं, जगांतील सर्व प्रकारचे अनुभव हा कवि घेऊन चुकला होता!

आत्मा पुनः दिसावा हें कसें घडेल ! जो मनुष्य ह्मणतो कीं, मीं आपल्या मित्रास किंवा कोणा मनुष्यास भूत झालेला पाहिला वगैरे, त्यानें जर यत्किंचित् विचार केला तर त्यास कळून येईल कीं.जें शरीर त्यानें प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं जाळलेलें किंवा पुरलेलें वगैरे पाहिलें तेंच पुनः दृष्टिगोचर कसें होईल ? पण कोणी कदाचित् ह्मणतील कीं, तेंच शरीर जरी दृष्टीस न पडलें, तरी त्यासारखें शरीर धारण करण्याचें पिशाचांचे अंगीं सामर्थ्य असेल, अशा शंकेवर उत्तर देणें कठीण आहे खरें; कारण या पंचेंद्रियविषयक सृष्टीखेरीज दुसऱ्या सृष्टीचें आपणास बिलकुल ज्ञान नाहीं, तसेंच यमपुरींतील, प्लुटोच्या नगरींतील, किंवा पर्गेटरींतील व्यवस्थाही इहलोकीं कळण्याचा बिलकुल मार्ग नाहीं ! असो; तर भुतांच्या अस्तित्वाच्या संभाव्यतेविषयीं हा विचार झाला. आतां दुसरें प्रत्यक्ष प्रमाण. हें प्रस्तुत वादास किती उपयोगी पडतें तें पाहूं. हें प्रमाणही येथें कोतेंच पडतें. आमचा स्वतःचा अनुभव जर कोणी विचारील, तर आह्मी असें ह[illegible] सांगूं कीं, सृष्टींतील अद्भुत चमत्कार पाहण्याची जशी मनुष्यमात्रास ज[illegible] त्याच हौस असते व असावी, त्याप्रमाणेंच आह्मांसही या [illegible]त्री अ[illegible]नात हौस आहे; व जर कोणी या गोष्टीविषयीं आमची पक्[illegible] र [illegible]री करून देईल तर ती करून घेण्याची आमची फार खुषी आहे.* फार तर

* वरील मजकूर केवळ ऐकिवावरून आह्मी लिहित नाही हें आमच्या वाचकांस कळविण्याकरितां स्वतःस घडलेला एक वृत्तांत येथें सांगतों. पुण्यांतील एका प्रसिद्ध गृहस्थाकडे एक भुतवाला येऊन त्यानें मी भुतें दाखवितों अशी प्रतिज्ञा भोगली. कोठें ह्मणून विचारतां त्यानें खंडोबाचा माळ सांगितला. तेव्हां दोन तीन गाड्या करून आमची एकंदर दहा पंधरा मंडळी भुतांच्या दर्शनार्थ तेथें डेक्कन कालेजापाशीं दाखल झाली. ती रात्र गतवर्षींच्या मार्गशीर्ष महिन्याची पौर्णिमा होती. आकाश निरभ्र असून चांदणें ( त्या भूतवाल्याची चांगली फजीतीच करण्याकरितां की काय, कोण जाणें ! ) फार नामी पडलें होतें. पण तेथें जाऊन पाहतों तों काय आहे ? भुतें तर नाहींतच; पण भुतांचीच खोड काढण्यासारखे आमच्या कालेजांतील विद्यार्थी ती बातमी समजून बाहेर इकडे तिकडे फिरत होते. ते मात्र रात्रीं वाट चुकलेल्या एकाद्या मनुष्यास त्या ओसाड ठिकाणीं पिशाचवत् भासते खरे ! असो; मग त्या मंत्रीबोवांनीं जेव्हां पाहिलें, कीं आतां तर दहाबारांचीं पन्नास साठ मंडळी झाली, तेव्हां मग कांहीं वेड्यावांकड्या सबबी सांगून त्यांनीं आपल्या लपविलेल्या सोंगाड्यासहवर्तमान निसटता पाय घेतला !

काय, पण जगांतील सर्व विद्वान् व शोधक लोकांची आह्मी बिनधोक हमी भरतों कीं, कितीही अकाळ विकाळ भुतांची, ब्रह्मसमंधांची, मुंजेबुवांची, किंवा वेताळ महाराजांची स्वारी प्रत्यक्ष दाखविण्याची जर कोणामध्यें शक्ति असेल, तर सूर्यग्रहणाला, गेल्या शुक्रयुतीला, गर्दी झाली नाहीं अशी देशोदेशच्या लक्षावधि लोकांची गर्दी वरील चमत्कार पाहण्यास हवी तेथें जमल ! शिवाय बीरमंत्राची एवढी भट्टी ज्यास साधली त्यास पिशादिकांचा राजा कुबेर यापासूनही प्रत्यक्ष मिळणारी नव्हे अशी संपत्ति त्यास देशोदेशचे लोक देतील. हवा तर खुद्द महाराणीच्या शिक्क्याचा भुतांबद्दल, समंधांबद्दल त्या महाभाग्यवान् मनुष्यास पेटंटचा चांदही मिळेल ! असो; पण भुतें नाहींत याचें हेंच एक मोठें साक्षात् प्रमाण आहे कीं, अशी गोष्ट आजपर्यंत कधीं झाली नाहीं ! समजा कीं, एकाद्यास पिशाच अनुकूल असून हवे ते चमत्कार त्यास करतां येत आहेत, तर तो त्या मौजेवर लोकांपासून हवा तितका पैसा काढणार नाहीं काय? जो आपल्या जवळच्या पिशाचास आज्ञा करून हलवायाच्या घरची पेढेबरफी आणवतो, त्यासच आपली पोतडी बगलेस मारून आपल्या भिकार खोपटांत गेल्यावर ओल्याकोरड्या भाकरीचीही कां बरें पंचाईत पडावी ? तसेंच ज्याच्या लहान कांडीचा असा पराक्रम कीं, ती हातावरून फिरविली असतां मुठींतील पैशाचा खाडदिशी रुपया होतो, तीच कांडी त्याच्या बिऱ्हाडीं कां स्वस्थ पडून राहते? एकाद्या मनुष्यास जर परीस सांपडला तर त्याचें सामर्थ्य दारोदार दाखवून त्यावर पैसा दोन पैसे मिळवण्यास त्यास हिंडावें लागेल काय? असो; तर पिशाच कोणाच्या स्वाधीन असणें हें मुळींच संभवत नाहीं; व ह्मणूनच तीं दृष्टीस पाडविण्याचें कोणामध्यें सामर्थ्य आहे हीही गोष्ट संभवदुक्तिक ह्मणतां येत नाहीं. आतां तिसरें प्रमाण भाषण किंवा लेख. यांत पहिल्या भाषणाविषयीं जर पाहिलें तर त्यांत पहिल्यानें हा चमत्कार आढळेल कीं, जो अशा गोष्टी सांगतो त्यास जर विचारलें कीं, तुह्मीं ही गोष्ट प्रत्यक्ष पाहिली काय ? तर 'पाहिली' असे

---

* हा शब्द 'यक्षिणी' शब्दाचा अपभ्रंश आहे. वरील मराठी शब्दांत अक्षरांबरोबर अर्थाचाही अपभ्रंशच झालासें दिसतें. 'मेघदूतां'तील नायिकेस 'जखीण' कोण ह्मणेल !—'तो जखड ह्मातारा झाला आहे' या वाक्यांत 'यक्ष' शब्दाचा तसाच दुहेरी अपभ्रंश दृष्टीस पडतो.

उत्तर न येतां नेहमीं 'एकलें' असेंच येईल ! तसेंच जो मनुष्य खोटें बोल- णारा नव्हे त्याच्याही तोंडून मी अमुक अमुक वेळीं अमुक अमुक ठिकाणून जात असतां पिंपळावर मुंजा, चिंचेवर जखीण* किंवा वडावर वेताळ पाहिला असेंही कधीं येणार नाहीं. पण जे वरच्या प्रकारचे मनुष्य नव्हेत, तर निवळ खोटया गोष्टीही जे केवळ मौजेखातर बनवून सांगत असतात, किंवा अशा भीति उत्पन्न करणाऱ्या गोष्टी सांगून ज्यांस कांहीं स्वार्थ साधावयाचा असतो, अशा लोकांच्याच तोंडून वरील गोष्टी बहुधा ऐकूं येतात; व त्यांस सत्याची पर्वा बिलकूल नसल्यामुळें शपथाआणा घेऊनही वरील खोटा बनावट मजकूर सांगतांना ते तिळमात्रही कांकूं क- रीत नाहींत. तर या तिन्ही गोष्टींचा नीट विचार करतां भुतांच्या अस्तित्वाचा मोठाच संशय येतो. आतां शेवटीं एक मात्र मुद्दा राहिलाः— लेख. याचाही निकाल पाडण्यास फार पंचाईत नको. कांकीं, कोणी प्राचीन किंवा अर्वाचीन ग्रंथकारानें मीं प्रत्यक्ष असा असा भुतांचा चमत्कार पाहि- ला असें लिहून ठेवलेलें आढळत नाहीं. निदान अलीकडे तरी असा चमत्कार दृष्टीस पडण्यासारखा असता तर तो कधींही गुप्त राहता ना ! सोसायटी ( मंडळी ) चीं पुस्तकें, मासिक पुस्तकें, वर्तमानपत्रें यांतून कोठें कोनाकोपऱ्यांत जरी अशी गोष्ट घडली तरी ती सर्वांस जाहीर झाल्या- खेरीज कधीं राहायाची नाहीं. पण भुतें जशीं दिवसास भितात त्याप्रमाणें- च वरील प्रसिद्धीच्या साधनांसही भिऊन, इसापनीतींतील उंदरांनीं जसा बेत केला होता कीं, कोणीही फळीखालीं उतरूं नये, त्याप्रमाणेंच इतःपर कोणी कोठेंही हूंकाचूं सुद्धां करूं नये असें जर सर्वांनीं कौंसल भरून ठर- विलें असेल तर मात्र न कळे ! असो; तर याप्रमाणें वरील तिन्ही प्रमाणां- वरून पाहतां भुतांच्या विरुद्धच निकाल होईल.

८. याप्रमाणें पिशाचांच्या अस्तित्वाविषयीं वस्तुदृष्ट्या विचार झाला. आतां त्यांविषयीं लोकांच्या मनांत जे कित्येक समज आहेत, कीं ज्यांवरून भूतसृष्टीच्या अस्तित्वाचें ते प्रमाण धरतात—त्यांत कितपत समंजसपणा आहे तो पाहूं. पहिला मोठा समज हा कीं, भुतें अंधारांत मात्र दृष्टीस पडायाचीं. शेक्सपीयरच्या ' ह्यामूलेट ' नामक प्रसिद्ध नाटकांत आरंभीं जें भूत दिसल्याचे एक दोन उत्कृष्ट प्रवेश आहेत त्यांत त्या कवीनें हीच सर्व लोकांची कल्पना तेथें दर्शविली आहे. त्या राजपुत्राचा भूत झालेला बाप मध्यरात्र उलटून गेल्यानंतर पहारा करणाऱ्या संत्र्यांस व त्यास दिसे

व कोंबडयाचा शब्द कानीं पडतांच उचकून 'हवेंतल्या हवेंत दिसेनासा होई!' असो; आतां या कल्पनेचें जर तथ्य पाहिलें तर काय निघेल ? भूत जर मनुष्यास अदृश्य आहे व हवें तेवढें रूप त्यास घेतां येतें, तर मग उजेडांतही येण्यास त्यास कां शंका वाटावी ? जें मुळींच अदृश्य त्यांस अंधार काय आणि उजेड काय ! तसेंच सात ताड उंच होतां येतें त्यास यःकश्चित् मनुष्याच्या बळाची काय पर्वा ! शिवाय लोकांची भुतांविषयीं अशी कल्पना आहे कीं, ज्याची आशा मागें राहिली, किंवा ज्यास आपल्या दावेदाराचा सूड जिवंतपणीं उगवतां आला नाहीं, तो भूत होऊन आपल्या वैऱ्यास छळतो. आतां ही दुसरी कल्पना जर खरी आहे, तर त्या भुताला आपल्या दावेदाराचा सूड घेण्यास किती उत्कृष्ट सोय झाली बरें ! स्वतः अदृश्य, हवें तितकें बळ, हवें तेथें हव्या तेवढ्या त्वरेनें जाण्याची मोकळीक, हवें तें करण्याचें सामर्थ्य; इतकी सामग्री असल्यावर मग त्या वैऱ्याच्या वरादारांचें वाटोळें करून त्याचें निसंतान सुद्धां त्यास क्षणाधींत करतां येईल. मग असें आजपर्यंत कोठेंही झाल्याचें बिलकूल ऐकूं येत नाहीं असें कां बरें असावें ? भुतांस, समंधांसही हायकोर्टांचा तर धाक वाटत नसेल ना ! काय असेल तें असो ! दुसरी कल्पना अशी कीं, तीं नेहेमी ओसाड जाग्यांतच दिसावयाचीं. अशा जाग्यांत मात्र तीं आपला नेहेमींचा क्रम मोडून एकटद्या दुकटद्या मनुष्यास कधीं कधीं दिवसासही दिसतात. पण हें त्यांचें करणेंही वरच्यासारखेंच विचित्र होय. मनुष्यास एवढें बुजण्याची त्यास काय गरज आहे ? बरें, शिवाय ओसाड एकांत प्रदेश व अंधार हीं जर त्यांस अत्यंत आवडतात, व अशा ठिकाणीं त्यांचा नेहेमींचा वास असायाचाच असें जर असतें, तर आमच्या शिवाजीसारखे सेनापति, ज्यांचा सारा जन्म निर्जन अरण्यांतून व डोंगरांतून वगैरे रात्रींच्या रात्रीं फिरतां गेला, त्यांस कोठेंच भुतांनीं भेडावलें नाहीं, किंवा त्यांस अटकाव केला नाहीं, हें कसें झालें ? तेव्हां भुतांविषयींच्या वरील कल्पना केवळ व्यर्थ होत.

६. वरील गोष्टी सर्व विचारी मनुष्यांच्या सहज ध्यानांत येणार आहेत; व त्यांवरून एकंदरींत पाहतां भुताविषयींच्या चोहोंकडे ऐकूं येणाऱ्या गोष्टी निवळ गप्पा आहेत असाच सिद्धांत होतो. या ह्मणण्यावर कोणी कदाचित् अशी शंका काढतील कीं, असेंच निखालस कसें एकदम ह्मणावें ? जिकडे तिकडे साऱ्या जगभर ज्या भुतांच्या गोष्टी ऐकूं येतात त्यां-

पैकीं पुष्कळ जरी लुच्चे किंवा भोळसर लोकांनीं सांगितल्या असल्या, तरी त्यांपैकीं कांहीं तरी खऱ्या झालेल्या असाव्या. उगाच आगीशिवाय कसा धूर निघेल ? हें ह्मणणें सकृद्दर्शनीं बरेंच समंजस वाटतें; व कित्येक नामांकित ग्रंथकारांनीं असाच गुळमुळीत अभिप्राय देऊन ठेवला आहे. * पण अंमळ विचार केला असतां कळून येईल कीं, अशा ठिकाणीं सगळ्या जगाचा अभिप्राय कांहीं उपयोगीं पडायाचा नाहीं. 'पांचा मुखीं परमेश्वर ' वगैरे ह्मणी अशा ठिकाणीं बिलकूल लागू पडत नाहींत. एकाद्या रत्नाची परीक्षा करणें असतां ती जशी लोकांचा मोठा जमाव जमवून त्यांच्या बहुमतानें ठरवणें केवळ अप्रयोजक होईल, त्याचप्रमाणें जेथें बुद्धीच्या सूक्ष्मत्वाचें काम लागतें तेथें सगळ्या जगाचें मत घेण्यांत कांहीं जीव नाहीं. पहिल्या उदाहरणांत रत्नपारख्याचें एकाचें मत जसें लक्षावधि मनुष्यांच्या मतांहून जास्त योग्यतेचें धरावयाचें त्याप्रमाणेंच दुसऱ्या उदाहरणांत तत्त्वविवेचकाचें मत साऱ्या जगाहून भारी असें समजावें. पृथ्वी फिरते कीं अचल आहे, अटलांटिक महासागराच्या पलीकडे भूमि आहे कीं नाहीं, या दोन्ही वादांत जसें सगळ्या दुनियेचें मत खोटें ठरून, व पोप महाराजांचेंही आज्ञापत्र मधल्या मधेंच राहून, ग्यालिलियो व कोलंबस हेच शहाणे ठरले, त्याचप्रमाणें आजपर्यंत हरएक गोष्टींत होत [illegible] उघडच आहे; ज्याची दृष्टि शाबूत आहे अशा एकट्या मनुष्याचें पाहणें खरें, कीं शंभर आंधळे आहेत आणि पांच पन्नास डोळ्यांवर सारा आलेले लोक आहेत त्यांचें बहुमत खरें ! आतां हीच गोष्ट प्रस्तुतच्या वादास लावून पहा. लाखों लोक भुतांविषयीं अंधपरंपरेनें चालत आले.

---

* वर जो आडिसन्चा भुतांविषयींचा निबंध सांगितला त्याचा एकंदर झोंक निराळाच असून शेवटचा अभिप्राय मात्र अंमळ विचित्रच आहे. पण तो शेवटचा मजकूर त्या ग्रंथकारानें व्याजोक्तीनें लिहिला असावासें आह्मांस वाटतें. जॉनसन्च्या 'रासेलसां ' त तर त्या ग्रंथकाराची नेहेमींची समजूतच स्पष्ट लिहिली आहे. जॉनसन् आपणाबरोबर कांहीं मंडळी घेऊन एक्या घरीं मध्यरात्रीं भुताशीं बोलण्याकरितां गेला होता, व तो सर्व खेळ एका नऊ दहा वर्षांच्या लबाडपोरीचा होता हें पुढें उमगलें. ही गोष्ट त्याच्या चारित्रांत प्रसिद्ध आहे. या सर्व प्रसिद्ध वृत्तांताचें नांव 'कॉक् लेन घोस्ट् ' ( 'कॉक नांवाच्या गल्लींतील भूत ' ) हें असून याबद्दल चर्चिल नामक विनोदी कवीनें जॉनसन्ची खूप फजीती उडविली होती.

त्या गोष्टी सांगतात; कांहीं थोडे मात्र आह्मीं पाहिलीं ह्मणून सांगतात, पण हे लुचे, भोळसर, किंवा वेडगळलेले अशाप्रकारचे; पण वरील दोन्ही प्रकार ज्याचे नाहींत, ज्याचें मन नव्या आरशासारखें स्वच्छ, त्यास मात्र कोणताच अनुभव प्रत्यक्ष घडत नाहीं. तेव्हां अर्थात् नकाराकडेच त्याचा कल होतो. असो; तेव्हां पिशाचादिकांच्या गोष्टी साऱ्या जगभर जरी आहेत, तरी यावरून कांहीं निष्पन्न होत नाहीं. कां कीं, मनुष्याच्या मनाचा हा धर्मच आहे कीं, डोळ्यास जसे नानाप्रकारचे आभास होतात त्याचप्रमाणें त्यासही व्हावे, ह्मणजे डोळ्यास जसें सूर्यबिंबाचें संध्यासमयीं प्रसरण व आरक्तता, अरण्यांतील मृगजल वगैरे अनेक आभास होतात, त्याचप्रमाणें मनासही होत असतें. हे भ्रम विचारांच्या योगानें मनुष्यास जसजसें यथार्थ ज्ञान प्राप्त होतें तसतसे नाहींसे होत जातात. पण हें जेव्हां नसतें तेव्हां वरील आभासांचा मनुष्याच्या मनावर पूर्ण अंमल चालू असतो: जसें लहानपणीं, मादक पदार्थाचें सेवन केलें असतां, ज्वरसृष्टींत वगैरे. वरील तिन्ही अवस्थांत मनुष्याला जे जे भास होत असतात ते सर्व खरेच वाटत असतात, ह्मणून त्यांतून सुटल्यावरही पाहिलेल्या सर्व गोष्टी खऱ्याच असें कोणी तरी ह्मणेल काय ? तर याचप्रमाणें अज्ञानाच्या काळीं लोकांची एकंदर स्थिति असते. खरें खोटें निवडण्यापुरता त्या वेळेस लोकांच्या बुद्धीस पोक्तपणा आलेला नसतो, यास्तव निबंधारंभीं जे कित्येक भ्रम सांगितले आहेत ते सर्व त्यांच्या ठायीं माजलेले आढळतात. व ते सर्वजनसाधारण असल्यामुळें मोठमोठ्या पंडितांच्या मनालाही अंशतः लागून राहिलेले आढळतात. असो, तर ज्याअर्थी भुतांविषयीं प्रमाण ह्मणणें अशाच भ्रांतींत बुचकळत राहिलेल्या लोकांचें धरायाचें, त्याअर्थी अशांची संख्या केवढीही असली, किंवा कधींमधीं मोठ्या नामांकित ग्रंथकारांचेही तसेंच समज झालेले असले, तरी तेवढ्यानेंच त्यांचीं मतें खरीं होतात असा अर्थ नाहीं.

७. असो; तर याप्रमाणें भुतांखेतांविषयीं जो बारीक रीतीनें विचार करील त्याचा एकंदर कल आमच्या सारखाच होईल. तो असा कीं, प्रत्यक्ष प्रमाण ह्मणून त्यास बिलकूल मिळणार नाहीं; तसेंच ज्याच्या खरेपणावर त्याचा पूर्ण विश्वास आहे असाही मनुष्य मीं भूत पाहिलें असें प्रतिज्ञेवर सांगणारा त्यास अगदीं सांपडणार नाहीं. शिवाय इतकेंही न करितां प्रकृत विषयाविषयीं जो आपणाशींच वस्तुतः शोध करूं लागेल

त्यासही त्याचा शुष्कपणा पूर्ण कळून येईल, कीं या सर्व अज्ञान लोकांच्या भ्रांति असून पाहूं गेलें असतां त्यांत तथ्य असणें हें मुळींच संभवत नाहीं. या असंभाव्यतेचीं वर कित्येक प्रमाणें सांगितलींच, पण आतां सरते शेवटीं आणखीही कांहीं अधिक सांगतों. एक हें कीं, भुतें जर दिसतात, तर आपणास माहीत आहेत तेवढींच कां दिसावीं? शंभर दोनशें वर्षांमागील एकादें भूत आतां कां दृष्टीस पडूं नये? तसेंच मनुष्यांचींच तेवढीं भुतें कां व्हावीं? देह सोडून गेलेला आत्मा ह्मणजे जर भूत तर पशुपक्ष्यादिकांचा* ही तसा प्रकार दृष्टीस पडावा; कां नये पडूं? मग आमचा मेलेला घोडा किंवा कुतरा भूत होऊन खिंकाळतो किंवा भोंकतो असें कोणाच्या सांगण्यांत येत नाहीं. हें कसें! असो; तेव्हां यावरून उघडच दिसतें कीं, या सर्व ज्याच्या त्याच्या मनास भासणाऱ्या शुष्क भ्रांति आहेत. जें ज्या वेळेस मनांत फार भरलें असतें तें जसें स्वप्नांत क्षणभर प्रत्यक्ष दिसतें, किंवा अमलाच्या गुंगींत जसा प्रकार होतो, तसाच कल्पनाशक्ति अनावर होऊन उच्छृंखल झाली असतांही होतो. हा प्रकार मुलांत व अज्ञान लोकांतच काय तो दृष्टीस पडतो याचेंही कारण तेंच. ज्याची विचारशक्ति कल्पनेहून प्रबळ झाली त्याच्या भूत कधींही वाटे जाणार नाहीं! आमच्या इकडच्या प्रांतांत भुतांविषयीं कोंकण फार प्रसिद्ध आहे, व यावरून 'कोंकणचीं भुतें' अशी ह्मणही पडली आहे. पण हींच भुतें शहरांत वगैरे कधीं दृष्टीस पडत नाहींत याचें कारण काय? शेंकडो साहेब लोक लोकवस्तीपासून दूर अशा बंगल्यांत किंवा तंबूंत निराळेच राहिलेले असतात, पण त्यांस कधींही पिशाचानें पछाडलेलें ऐकण्यांत नाहीं. ते रानें तोडतात, डोंगर पोंखरतात, पण कोणीही त्यांच्या वाटे जात नाहीं. त्यांच्या उग्रस्वभावापुढें भुतांचाही थरकांपच होतो कीं काय कोण जाणें! असो; तेव्हां एकंदरींत सर्व प्रकार निवळ भीतीचे आहेत. 'भितऱ्यापाठीं ब्रह्मराक्षस' या

* हें अर्थातच आमच्या धर्माच्या लोकांचेंच मत होय. ख्रिस्ती वगैरे लोकांस हें मान्य होणार नाहीं. आत्मा असा फक्त मनुष्यास मात्र आहे; व बाकीच्या कोणत्याही प्राण्यास नाहीं हें त्यांच्या धर्मांतील एक मुख्य मत आहे. यावरच पुनर्जन्माचा अभाव व हिंसेची निर्दोषता तद्धर्मी लोक ठरवतात. असो; या मताच्या तथ्यत्वाचा येथें आह्मांस विचार करणें नाहीं. तरी वरील मतासारखेंच दुसरेंही एक मत येथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. महमदी धर्माप्रमाणें स्त्रियाही आत्मशून्य होत! आह्मांस तर असें वाटतें कीं, या मताचे प्रतिपादक मात्र तसे खरे!

म्हणतात तरी हाच अर्थ सुचविला आहे, कीं भुतें, ब्रह्मराक्षस हे सर्व कल्पनेचे खेळ आहेत. सुविचाराचे योगानें ज्यानें तत्त्वशोध केला त्यास भुतपिशाचादिकांची शंकाही मनांत यावयाची नाहीं, मग भीति तर कोठली?*

असो; या खेपेस निबंधाच्या आरंभीं लोकभ्रमाचे जे अनेक प्रकार सांगितले त्यांपैकीं एकाचें विवेचन झालें. पुढल्यांचें क्रमाक्रमानें पुढील निबंधांत होत जाईल. अशा विषयावर लोकांचीं मनें निभ्रांत करणें अगदीं अवश्य आहे. आतां यांवरून जुन्या पद्धतीच्या कित्येक लोकांच्या मनांत अशा कल्पना येण्याचा संभव आहे कीं, अशा विषयांवर उघडपणें आपले

---

* भुतांविषयीं सुविचाराचे योगानें निर्भ्रांत न होतां जो केवळ धडाईनें भुतांशीं सामना करील त्याची खालीं लिहिल्याप्रमाणें फजीती होण्याचा संभव आहे. पुढील गोष्ट येथेंच घडलेली आम्हीं ऐकिली आहे. एका मित्रमंडळीचा अशा विषयावर वाद चालला असतां पैज पडली कीं, जो अवसेच्या रिवशीं मसणवटींत जाऊन तेथें खुंटी ठोकून येईल तो खरा धीट, त्याला सर्वांनीं अमुक अमुक रुपये द्यावे. असें बोलणें होतांच एकजण मी हें काम करतों असें म्हणून छातीस हात लावून तयार झाला. मग अवसेच्या रिवशीं मध्यानीच्या सुमारास सारी मंडळी येथील ओंकारेश्वराच्या देवळाशीं जाऊन बसली, व तो पैज मारणारा गडी एका हातांत लांकडाची मेख व दुसऱ्यांत ठोकावयास एक चांगला भक्कम धोंडा अशा सरंजामानें मसणवटीकडे निघाला. जात्या स्वारी धीटच होती, तेव्हां काळोखांतून बेधडक अर्ध्या वाळवंटापर्यंत गेली. नंतर तेथून आपल्या सोबत्यांस हांक मारून ओरडला, 'पहा रे, येथें मेख ठोकतों!' ही फुशारकीची आरोळी त्याच्या मंडळीनें ऐकली; पण फार वेळ गेला नाहीं तोंच दुसरी निराळ्याच प्रकारची किंकाळी त्यांच्या कानीं आली—'मेलों रे मे—!' ती ऐकून त्याच्या सोबत्यांच्या उरांत धडाड झालें. मग कांहीं वेळानें ते सारे व दुसरी आणखी मंडळी असे कंदील घेऊन स्मशानांत उतरले. भीत भीत जवळ जाऊन पाहतात तों राजश्री निपचित पडले आहेत! मग त्यांस उठवूं लागले तेव्हां बोबडी वळल्याचें कारण उमगलें. काय? तर मेख ठोकतांना अंगरखा सांवरून न बसल्यामुळें ती अंगरख्याबरोबरच वाळूंत ठोकली गेली. तेव्हां अर्थात उठूं लागतांच भुतानें पछाडल्याचा बावांस भास झाला! असो; पुढील वृत्तांत उघडच आहे. सर्वांनीं त्या भुतांच्या प्रतिमल्लास प्रेतभूमींतून प्रेतसंप्रदायाविरुद्ध माघारीं उचलून आणून देवळांत ठेवलें. नंतर तोंडावर पाणीबिणी शिंपडल्यावर चार सहा घटकांनीं स्वारी सावध झाली. याप्रमाणें पैजेपरी पैज बुडाली आणि मंडळीचें हसें मात्र झालें,—पण बरें तितक्यावरच गेलें, जिवावरच येऊन बेतली होती तो प्रसंग दैवयोगानें टळला!—तर वेडेपणाची धडाई अशी एखाद्या वेळीं भोंवते!

विचार प्रदर्शित केले असतां लोकांची धर्मावरील श्रद्धा कमी होऊन नास्तिकपणा वाढविलासा होईल. पण ही केवळ भ्रांति होय. वर जे लोकभ्रमाचे आह्मीं विषय काढले आहेत त्यांचा आणि धर्माचा बिलकुल संबंध नाहीं. उलटा त्याचा धर्माशीं कांहीं अंशीं विरोधच आहे असें ह्मटलें पाहिजे. आजपर्यंत सर्व देशांत दोहोंचें ऐक्यच सर्व मानीत नाहींत, फार तर काय, आमच्या महाराष्ट्रांतही जे मोठे विख्यात साधु होऊन गेले त्यांनींही तें सर्व निवळ थोतांड ह्मणून खुशाल ह्मटलें आहे हेंच दाखविण्याकरतां निबंधारंभींचा चुटका तुकारामाच्या ग्रंथांतला घेतला असून आतां सरते शेवटीं रामदासाचे प्रस्तुत विषयास उद्देशून लिहिलेले सर्व प्रसिद्ध अभंग येथें दाखल करतों:—

वाजे पाऊल आपलें; ह्मणे मागें कोण आलें। कोण धांवतसे आड; पाहों जातां झालें झाड। भावीतसे अभ्यंतरीं; कोण चाले बरोबरी। शब्द पडसाद ऊठला; ह्मणे कोण रे बोलिला। रामीं रामदास ह्मणे; संशयाचीं हीं लक्षणें। कांहीं दिसे अकस्मात; तेथें वाटे आलें भूत। पाया पडावें संदेहीं; मुळीं तेथें कांहीं नाहीं। झाडझुडप देखिलें; जिवीं वाटे कोणी आलें। रामदास सांगे खूण; भितो आपणा आपण। छाया देखुनी आपली; शंका अंतरीं वाटली। ऐसें भ्रमाचें लक्षण; भुले आपणा आपण। मुखें बोलतां उत्तर; तेथें झालें प्रत्युत्तर। डोळां घालितां आंगोळी; एकाचीं तीं दोन झालीं। पोटीं आपण कल्पिलें; तेंचि आलेसें वाटलें। दास ह्मणे हे उपाधी; शंका धरतां अधिक बाधी ॥

---

## अंक १४ वा.

ग्रहाणां चरितं स्वप्नोऽनिमित्तोत्पादक तथा।
फलंति काकतालीयं तेभ्यः प्राज्ञा न बिभ्यति ॥* वेणीसंहार २.

१. मागील अंकांत चालू विषयापैकीं एक कलम झालें. आतां यांत दुसऱ्या एकाचा विचार करूं. हें कलम शकुन होय.

---

* "ग्रहांचे योग, स्वप्नें, आणि अपशकुन यांचें फळ केवळ काकतालीयन्यायानें दृष्टोत्पत्तीस येतें! वास्तव जाणते पुरुष त्यांचा धाक मानीत नाहींत."

२. हा भ्रमाचा प्रकारही मागल्याप्रमाणेंच सार्वत्रिक आहे. कोणत्याही देशांत शकुनाचे निरनिराळे प्रकार नव्हतेसे नाहींत. युरोपांतील प्राचीन ज्ञानसंपन्न राष्ट्रें ग्रीक व रोमन लोक यांच्याही इतिहासांत हें खूळ पुष्कळच दृष्टीस पडतें; व अद्यापही त्या खंडांत अडाणी लोकांमध्यें भुतेंखेतें, ग्रहफळें, जादू वगैरेवर जसा विश्वास आहे तसाच शकुनावरही बहुधा असेलच. आमच्या देशांत हा प्रकार आजपर्यंत भरपूर चालत आला आहेच. असो: आतां हे सर्व प्रकार अनुक्रमानें सांगून नंतर त्यांत तथ्य असण्याचा संभव किती याविषयीं विवेचन करूं.

३. शकुन ह्मणजे पुढें घडणाऱ्या शुभाशुभ गोष्टींचें सूचक. यावरून शकुन अर्थात् दोन प्रकारचे झाले: एक शुभ आणि दुसरा अशुभ. या दोहोंविषयीं निश्चित प्रमाण ह्मणून कांहींच नसल्यामुळें असें अर्थातच होत असेल कीं, जें एका देशांत शुभ त्यासच दुसऱ्यांत अशुभ मानीत असतील, व अशुभास शुभ. शकुन पुष्कळ गोष्टींवरून मानतात. पक्ष्यांच्या शब्दांवरून व गतींवरून, कोणत्याही आवाजावरून, पोरांच्या साहजिक बोलण्यावरून, नेत्रादि स्फुरण पावल्यावरून वगैरे; तसेंच मांजर, चासपक्षी, कावळा, †घुबड, पिंगळे, कवडा, * इत्यादि प्राणीही शुभाशुभ-

---

† या पक्ष्याचें संस्कृत नांव 'कौशिक' असें मोठें पवित्र आहे. पण हल्लींचें त्याचें मराठींतील नांव उच्चारण्यासही लोक भितात. तसें करणें पाप मानून त्याबद्दल बोलणेंच झाल्यास 'दिवाभीत' हा त्या शब्दाचा पर्याय योजतात. या पक्ष्याचा शब्द अपशकुनी मानून लोक याविषयीं असेंही सांगतात कीं, यास दगड मारिला असतां तो तो झेलतें, आणि उगाळीत बसतें; आणि त्या उगाळल्यानें तो दगड जसजसा झिजत जातो, तसतसें तें माणूसही झिजत जातें, आणि शेवटीं मरतें!—या पक्ष्यास एके ठिकाणीं मात्र मोठा मान असे; तो अशा तशा ठिकाणीं नव्हे, तर अथेन्स शहरांत! त्या लोकांची मुख्य विद्याधिदेवता जी मिनर्वा तिला हा पक्षी प्रिय असून तिच्या निशाणावर याची प्रतिमा असे. असा जगाद्विलक्षण मान त्या चतुर लोकांनीं या पक्ष्यास देण्याचा आशय असा दिसतो कीं, विद्येच्या उपासकांचें आणि मिनर्वा देवीच्या आवडत्या अशा या पक्ष्याचें पुष्कळ साम्य दिसतें. तें असें:-दोहोंची निशाचरवृत्ति, जगापासून अलिप्तपणा, मुद्रा गंभीर, आणि एकंदर व्यवहार शांतपणाचे!

* हा शब्द 'कपोत' शब्दाचा अपभ्रंश दिसतो. हा पक्षी अशुभसूचक होय हे मोरोपंताच्या पुढील आर्येवरून दिसून येईल. विदुर शकुनीस उद्देशून ह्मणतो:-

'हा न भला बुडवाया शिरला या राजमंदिरीं कवडा' सभापर्व.

सूचक मानले आहेत. ग्रहांचे योग तर चोहोंकडे शुभावह व अशुभावह मानलेले असून आमच्या देशांत तर त्यांवांचून कांहींही चालत नाहीं. सैपाकघरांत चुली घालण्यापासून तों मोठ्या मोहिमेस बाहेर पडण्यापर्यंत ग्रहांचें आनुकूल्य अगोदर करून घ्यावें लागतें. हा प्रकार ग्रीक व रोमन लोकांतही पुष्कळ होता हें वर लिहिलेंच आहे. त्यांच्या इतिहासांत अशीं उदाहरणें सांपडतात. एकदा कोणत्या एका देवतेस रोम शहरीं यज्ञ चालला असतां पशूच्या शरीरांतलें काळीजच नाहींसें झालें. तें देवताक्षोभाचें दर्शक व अत्यंत अशुभ जाणून लोक फार भ्याले. दुसरे एके प्रसंगीं असें झालें कीं, देवाचीं कोंबड्याचीं पिलीं चारा खाईनात. तेव्हां त्यांच्या रक्षक भयभीत होऊन त्यानें सेनापतीस वरदी दिली कीं, हें मोठें अशुभ झालें आहे, तर या वेळेस शत्रूशीं लढाई करूं नये. तो सेनापति आपला असाच होता; त्यानें त्या अपशकुनाची मुळींच पर्वा न करितां त्या रक्षकाचीच उलटी निर्भत्सना केली. आणि त्या कोंबड्याच्या पोरांस उचलून समुद्रांत झुगारून दिलें, आणि ह्मणाला, "बरें, चारा नको तर नको, पाणी कां पिईनात!" * या धर्म—+ +—पणाचें त्यास लवकरच प्रायश्चित्त भोगावें लागलें. कार्थेजिनियन लोकांनीं त्याचा समुद्रावर अगदीं पराभव करून टाकला, व त्यामुळें व वरच्या दांडगाईबद्दल त्याला रोमन लोकांनीं कामावरून दूर केलें. अथिनिअन व स्पार्टन लोकांतही हें खूळ होतें. पारसीकांनीं पहिल्यानें जी ग्रीस देशावर स्वारी केली त्या वेळेस अथेन्सच्या साहाय्यास स्पार्टन लोक आले नाहींत. कां तर पौर्णिमेच्या अगोदर लढाईस निघूं नये असा त्यांचा नियम होता! तसेंच पुढें स्पार्टन व अथिनियन लोकांनीं स्वारी केली तींतही वरीलच प्रकार घडला. तेथून गुप्तपणें निसटून माघारीं येण्याचा त्यांनीं बेत केला होता, पण इतक्यांत

---

* यासारखाच धट्टपणा दुर्योधनानें 'वेणीसंहार' नाटकांत केला आहे. मोठें वारें सुटून रथाचा ध्वज मोडून पडला असतां त्याचा कंचुकी 'भग्नं, भग्नं' करीत एकाएकीं ओरडत आला, आणि भावी घोर अनर्थाचें सूचक जें ध्वजपतन तें त्यानें मोठ्या भयाच्या मुद्रेनें आंत येऊन त्यास निवेदन केलें. पण दुर्योधनास त्या अपशकुनाचें कांहींच न वाटून तो त्या घाबरलेल्या कंचुकीस रागें मात्र भरला. आणि शेवटीं ह्मणाला कीं, 'अं:, यांतरे काय आहे! जा वाड्यांत जाऊन पुरोहितास सांग ह्मणजे तो याची शांतिबिंती कांहीं करील!'—निबंधारंभींचें वचन याच बड्या राजश्रीचें आहे!

चंद्रग्रहण लागल्यामुळें शकुनज्ञ लोकांनीं त्यांस कळविलें कीं, या ग्रहणाव-रून देवांची अशी सूचना दिसते कीं, पुढील पौर्णिमेपर्यंत आपण तेथून निघूं नये. त्याप्रमाणें निघून जाण्याचा बेत रहित झाला. मग तितक्या अवकाशांत शत्रूंनीं तयारी करून त्यांचा अगदीं मोड केला. असो; तसेंच वरील दोन्ही लोकांत शकुनज्ञ ह्मणून निराळे शिकवलेलेच लोक असत. यांस पाठशाळांत पढवून शकुन कसे पहावे व यांचा अर्थ कसा करावा हें शिकवीत. हें शकुनशास्त्र* त्यांनीं कसें रचलें असेल व त्यांत नियम वगैरे काय करून ठेवले असतील तें पाहण्यास सांपडलें असतें तर मोठी मौज होती!

४. असो; आतां आपल्या लोकांत जे निरनिराळे प्रकार आहेत ते पाहूं. पहिला सर्वांत मोठा शकुन ह्मटला ह्मणजे मांजराचा होय. कोणी कांहीं कार्यानिमित्त बाहेर पडला, आणि वाटेनें मांजर आडवें गेलें, कीं गेली मसलत! ही मांजराची गम्मत पुष्कळांनीं पाहिली असेल. एकादे वेळेस दोघे चौघे कोठें निघाले असतां मध्येंच एखाद्या घरांतून मांजर निघतें व माणसांच्या भयानें तें रस्ता ओलांडून समोरच्या घराकडे पळत जाऊं लागतें. त्या बिचाऱ्याच्या ध्यानीं मनींही नसतें, कीं आपल्या साहजिक जाण्यानें या गृहस्थास आपण अपशकुन करीत आहों; व आपल्या केवळ यदृच्छेच्या गतीचा जाणाऱ्या गृहस्थांच्या कार्यावर एवढा जबरदस्त परि-णाम घडणार आहे! वास्तव तें खुशाल बिनधोक जात असतें. पण इत-क्यांत हे गृहस्थ हकाटी करून दोघे इकडे होतात—दोघे तिकडे होतात, आणि त्यास हुसकूं लागतात. मांजरास आपणावर एकाएकीं एवढा गह-जप गुजरण्याचा अर्थ कांहींच न कळून बिचारें अगदीं गांगरून जातें, आणि इकडे पळ तिकडे पळ अशी त्याची त्रेधा उडते! मग त्या धांद-लींत बहुधा त्या गृहस्थांच्या इच्छेविरुद्धच त्याचें गमन होतें! याप्रमाणें घडणाऱ्या शकुनास बळेंच माघारीं फिरविण्याचा यांचा यत्न निष्फळ झाला असतां हे हिरमुसे होऊन माघारीं फिरतात; किंवा त्या अपशकुना-वरही कांहीं तडजोड चालवून पुनः मार्गस्थ होतात! याप्रमाणेंच विधवेचें

---

* शकुनविद्येस इंग्रेजी नाव augury असें आहे. संस्कृतांत पक्ष्यास 'शकुनि' असा एक पर्याय आहे; आणि वरील इंग्रेजी शब्दाची व्युत्पत्तिही तशीच आहे—'avis' 'a bird' (पक्षी)-यावरून शकुन पाहण्याचें मुख्य ठिकाण पक्षी होते असें असलसें दिसतें.

दर्शन, प्रेत समोरून येणें, वगैरे हीं अशुभसूचक होत. हिंदुस्थानांत ह्मणजे शिंद्याच्या, होळकराच्या वगैरे मुलखांकडे शिंकणें हेंही अपशकुन मानतात. वाटेनें निघाले असतां वगैरे कोणी शिंकतां कामा नये. गाईकवाडाच्या मुलखांत विधवेप्रमाणेंच विधुराचेंही मुखावलोकन अशुभ धरतात. जो विधुर ह्मणजे गतस्त्रीक झाला त्याला राजवाडा वर्ज! अन्याय व अंदाधुंदी यांविषयीं प्रसिद्ध असणाऱ्या आमच्या वरील मराठी संस्थानांत हा मोठाच न्याय घडतो असें सर्व स्त्रीपक्षपाती लोक कबूल करतील. असो; तर असे अपशकुनाचे अनेक प्रकार आहेत.

आतां कांहीं शुभ शकुन सांगतों. सकाळचे प्रहरीं कोल्ह्याचें तोंड दृष्टीस पडणें; डावा डोळा लवणें; उजवा बाहु स्फुरण पावणें वगैरे. तसेंच घराच्या बाहेर पडतांच सवाष्ण बायका कडेवर पाण्यानें भरलेल्या घागरी घेऊन सामोऱ्या येणें. हा शेवटला शकुन फार उत्कृष्ट समजतात; व मागील पद्धतीच्या श्रीमंत लोकांची अशी चालही सांगतात कीं, ते कांहीं एकाद्या मोठ्या कार्यास बाहेर पडले असतां दहा पांच बायका वर सांगितल्याप्रमाणें मुद्दाम तयारी करून स्वारी घराबाहेर पडते आहे तोंच त्यांस सामोऱ्या याव्या अशी आधींच तजवीज करून ठेवायाची! तसेंच ज्या वाटेनें वडी स्वारी जायची त्या वाटेंत कोणी अपशकुनी माणूस येऊं नये ह्मणून अगोदर शिपायांनीं पुढें धांवून बंदोबस्त करून ठेवायाचा! हें वाचून सर्व सुविचारी मनुष्यांस हसूं आल्याखेरीज राहणार नाहीं. एक तर शकुन अपशकुन ह्मणजे सारी निवळ भ्रांति. त्यांतून त्यांस यदृच्छेनें घडूं न देतां अपशकुनास पिटून लावून चांगल्या शुभ अशा शकुनांस मुद्दाम कैद करून आणून पुढें उभें करणें व तसल्या मारून मुटकुन आणलेल्या शकुनांचे शुभत्व मानणें ह्मणजे मूर्खत्वाची कांहीं सीमा झाली. अशा जुलमाच्या शकुनांचा हर्ष मानणें ह्मणजे सोंगट्या खेळत असतां दर वेळेस फासे हवे तसे जुळून जसेचे तसेच खालीं ठेवून दुसऱ्यावर डाव करणें, व त्यांत फुशारकी मिरवणें; किंवा रंगभूमीवर रामाचें किंवा भीमाचें सोंग घेऊन रावणाचा पराभव केल्याबद्दल किंवा जीमूतमल्लास चीत केल्याबद्दल शौर्याची व बळाची प्रौढी झोंकणें यासारखेंच हास्यास्पद होय. असो; तर याप्रमाणें मूर्खत्वाच्या एका प्रकारास थारा मिळाला असतां त्याचे भाऊबंद दुसरे अनेक प्रकार त्याच्या भोंवतीं जमतात.

८. वर शकुनाचे कांहीं निरनिराळे प्रकार सांगितले. आतां यांवर विश्वास ठेवणें यांत समंजसपणा कितपत आहे याविषयीं विचार करूं. कोणतीही गोष्ट खरी मानण्यास अनुभवसिद्ध प्रमाण पाहिजे; तें इतर लोकभ्रमांप्रमाणेंच यासही बिलकुल मिळणार नाहीं. वर सांगितलेलें मांजराचेंच नेहमींचें उदाहरण घ्या. कांहीं कामास निघालें असतां मांजर आडवें गेलें, आणि तें काम हटकून झालें नाहीं, असें कोणाच्या तरी अनुभवास आजपर्यंत आलें असेल काय? कार्याचें स्वरूप, कर्त्याचें शहाणपण व हिंमत, साधनांचा योग्यायोग्यपणा इत्यादिकांवर हातीं घेतलेल्या कामांत यश अगर अपयश येणें हें सदासर्वदा असतें. त्यांत बिचाऱ्या मांजराच्या जाण्याचा कांहींच संबंध नसतो. दुसरे जसे लक्षावधि व्यापार त्या वेळेस सृष्टींत चाललेले असतात त्याप्रमाणेंच मांजरानें रस्ता ओलांडून जाणें हा एक होय. मग होणाऱ्या कार्याची असिद्धिही त्या बिचाऱ्या एकट्यावरच कां लोटावी? दिसण्यांत परस्पर असंबद्ध असणाऱ्या लक्षावधि कार्यांचा जर कांहीं अपूर्व संबंध केवळ खुषीखातर इकडून तिकडे जाणाऱ्या मांजरावर जितका येईल तितकाच कोट्यावधि दुसऱ्या गोष्टींवरही येईल. समजा कीं, पुणें मुक्कामीं कोणी गोमाजी तिमाजीस भेटण्याकरितां गेले, आणि तिमाजी भेटले नाहींत, तर तें अपेश सोम्या नांवाच्या मांजरावरच कां? गोमाजींनीं त्या वेळेस पांढरें पागोटें घातलें होतें, किंवा आदल्या रात्रीं ते जेवले नव्हते, हेंच भेट न होण्याचें कारण कशावरून नसेल? अथवा हेंचसें काय, त्याच क्षणीं लंडन शहरांत अमुक अमुक मनुष्यास अमुक अमुक झालें तें आमच्या शकुनभोळ्या गृहस्थास कशावरून बाधक झालें नसेल? बिचारें मांजर तेवढें पुढें दिसलें त्यानेंच काय पाप केलें? बुद्धीच्या मार्गानें लक्षांत न येणारा असा कांहीं विलक्षणच कार्यकारणसंबंध हजारों गोष्टींत असतो असें जर एकदां म्हटलें, तर मग अमुकापासूनच अमुक कार्य झालें असें म्हणण्यास जागा कोणती राहिली? निश्चित असें कांहीं नाहीं, सारेंच अनिश्चित, असें जेथें झालें, तेथें एकाच व्यक्तीवर निमित्त ठेवण्यास आधार काय? ईश्वराच्या घरचें तंत्र सगळेंच जर असें तऱ्हेवाईक असलें, तर मग त्यांत मनुष्यानें अमुक अमुकच नियम करून ठेवणें हा केवळ मूर्खपणा! असो; तर असे विचित्र संबंध जोडीत बसणें हा निवळ वेडेपणा आहे. आणि

त्यांचा खोटेपणा जर पावलोपावलीं प्रत्ययास येतो, तर त्यांवर विश्वास ठेवणें अगदीं अप्रयोजक होय.

६. पण यावर कोणीं अशी शंका घेतली कीं, आजपर्यंत हा विश्वास साऱ्या देशांतील लोकांचा पूर्ण होता, आणि अजूनही लक्षावधि लोकांचा आहे, तर हे सर्व लोक कांहींच प्रमाण पाहिल्याशिवाय विश्वास धरीत असतील काय? अशा ह्मणण्याचा गेल्या अंकांत बराच विचार केला आहे. तरी त्यावर आणखीही लिहिण्यास पुष्कळ आहे. अज्ञान जे असतात त्यांच्या तोंडून हें वाक्य नेहमीं ऐकूं येतें. त्यांना एकादी नवी व सकृद्दर्शनीं विलक्षण वाटण्यासारखी गोष्ट सांगा, कीं हा वाद पुढें ठेवलेला! काय हो, हजारों लाखों लोकांचें असें मत आहे, आणि हाच काय तो शहाणा, इतक्या सगळ्या लोकांना ज्ञान शिकविणारा! आजपर्यंत साक्रेटीस, कोलंबस, ग्यालिलियो, न्यूटन, बेकन, वॉट वगैरे जे मोठमोठे शोधक होऊन गेले त्या सर्वांशीं बाकीच्या अज्ञानग्रस्त जगाचें हें भांडण;– आज हाच निघाला दीड शहाणा आह्मांस सांगायाला! आजपर्यंत लोक झाले ते सगळे मूर्खच! तर याप्रमाणें मनानें एकदा घेतलेले ग्रह सोडण्याची जगास नेहमीं मारामार पडते. एकंदर लोकांची दुसरीही एक मोठी चूक अशी दृष्टीस पडते, कीं एकाद्या गोष्टीचा खरेपणा किंवा खोटेपणा तिच्या स्वरूपावरूनच न पाहतां ते नेहमीं बहुमताकडे धांवत असतात! ह्मणजे शरीराच्या संबंधानें जसें जिकडे पुष्कळ मंडळी असेल तिकडे जाणें सुरक्षित, तसेंच मनाच्याही संबंधानें असेलसें त्यांस वाटतें. पण ही अर्थातच मोठी चूक आहे. हजारों लोक जर एकीकडे आहेत, आणि दुसरीकडे एकटाच मनुष्य त्यांच्याशीं भांडणारा असला, तर हा दुसरा तेव्हांच चिरडून जाईल यांत संशय नाहीं; पण मनाच्या संबंधानें हीच गोष्ट अगदीं उलटी पडते. ह्मणजे ज्याच्यापाशीं मजबूत प्रमाण आहे तो मनुष्य उलट पक्षाच्या कोट्यानुकोटी मनुष्यांसही भारीच होतो! ठीकच आहे; पहा कीं, ज्यापाशीं दिवा आहे तो त्या दिव्यावर अंधाराचे डोंगराचे डोंगर आणून लोटले तरी डगमगेल काय? असो; पण अशा सत्यरूप ज्योतीचे किरण एकंदर जगाच्या ज्ञाननेत्रांत सुखेंकरून कधींही प्रवेश करीत नाहींत; त्यास अनेक प्रकारचे दोष जडले असल्यामुळें अगोदर त्यांचा त्यांत रिघाव होणें हें सुद्धां बहुतेक ठिकाणीं केवळ दुरापास्तच असतें! तेव्हां अर्थातच सर्वांस बहुधा एक धोपट मार्ग माहीत असतो,

कीं पुष्कळांचें जें मत असेल तेंच आपलें मत ह्मणावें; सगळ्यांची वाट ती आपली वाट! हाच एकंदर जगाचा कल लक्षांत आणून कोणीं तत्त्वज्ञानें ह्मटलें आहे—

गतानुगतिको लोको न लोकः परमार्थिकः ।

"एकानें केलें ह्मणून दुसऱ्यानें करावें हाच प्रकार या जनाचा आहे; परमार्थ ह्मणजे तत्त्व जाणणारा थोडा!" तसेंच कालिदासाचें वचन आहे.

असो; तर याप्रमाणें या जगाची रहाटी आहे. जें एकदा मत पडून गेलें त्यासच सारे अनुसरतात; मग तें खरें असो कीं खोटें असो! त्याच्या स्वरूपाविषयीं बारीक विचार करण्याचें कोणाच्या मनांतही येत नाहीं, आणि तसें करण्याची योग्यताही थोड्यांचीच असते. याचकरतां लोकशिक्षणाचा जेवढा फैलावा होईल तेवढा देशास हितावहच होतो. त्याच्या योगानें लोकांचें भ्रमजाल तुटून सत्यासत्याची निवड करण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य येऊं लागतें. पण याचा प्रसार जेथें झालेला नसतो तेथें अर्थातच वरचा गतानुगतिकत्वाचाच न्याय. तेथें प्रमाणें कसलीं आणि अनुभव कसला!

बरें; पण शकुनादिकांवर ज्याचा पूर्ण भरंवसा आहे त्याला जर कोणीं विचारलें कीं, तूं हें सर्व खरें मानतोस तर त्याचा दाखला तूं कोणता पाहिला आहेस? तर तो मनुष्य उगीच बसावयाचा नाहीं; तसा ठोका आल्याचीं तो पांच सात उदाहरणें सांगेल, आणि त्यांवरून सिद्धांत करील कीं, हें सर्व खरें आहे. हीच अशा लोकांची मोठी चूक असते. जेवढीं आपल्या तर्फेचीं ह्मणजे शकुन पटल्याचीं उदाहरणें असतात तेवढींच ते घेतात; पण त्याच्या उलटचीं मात्र बिलकुल घेत नाहींत. याविषयीं बेकननें एके ठिकाणीं एक मजेदार गोष्ट लिहिली आहे. प्राचीन काळीं ग्रीस देशांत इतर सर्व राष्ट्रांतल्याप्रमाणेंच मूर्तिपूजेचा प्रचार असे, आणि पुष्कळ देवता उपदेवता वगैरे ते लोक मानीत. एकदा असें झालें कीं, नवसाच्या प्रचीतीबद्दल वाद चालला असतां तो वाद करणाऱ्यानें आपल्या प्रतिपक्ष्यास त्याची खात्री करण्याकरतां नेप्च्यूनच्या देवळांत नेलें. नेप्च्यून हा हिंदु लोकांच्या वरुणाप्रमाणें समुद्राचें दैवत होतें. तेथें त्यानें त्या नास्तिकास देवास नवस करून वाहिलेला पुष्कळ सरंजाम दाखविला, आणि शेवटीं ह्मणाला, 'पहा, किती लोकांस हा देव पावला तो!' त्याच्या प्रतिपक्ष्यानें उत्तर केलें, 'ह्मणतोस तें खरें; पण असें न होऊन ज्यांचीं

जहाजें बुडालीं असतील त्यांची खूण येथें कोठें आहे ? त्या जर असत्या तर त्याही मीं तुला दाखविल्या असत्या ! ' असो; तर शकुनांच्या खरे- पणाविषयींचीं प्रमाणें लोक जीं सांगतात तीं सारीं अशा प्रकारचीं असतात. कोणी बहादर कांहीं कामाला निघाले, आणि तोंडांत मारल्यासारखे माघारीं आले, कीं तें सारें अपेश सामोरें आलेल्या मांजरावर ! आणि असें एकदा दोनदा झालें, कीं झाला तो ठोका ! पण ज्या कामाला हात घातला तेंच जर होण्यासारखें नसलें, किंवा या राजश्रींच्या अंगचें कर्तृत्वच तितपत असलें, तर त्या बिचाऱ्या मांजराकडे काय बोल ? पण तें कांहीं नाहीं. अपेशास मूळ कारण तें मांजरच ! एरवीं यांच्या हातून फत्ते झाल्याखेरीज राहावयाचीच नाहीं !

७. असो; तर याप्रमाणें हा शुद्ध भ्रांतीचा प्रकार आहे; त्यांत तथ्य पाहूं जातां बिलकुल सांपडणार नाहीं. आतां यापासून अनर्थ कोणते कोणते आहेत ते पहा. एक तर हा निवळ भ्रम असल्यामुळें तो मनास चिकटल्यानें त्यास दुर्बलता प्राप्त होते; ह्मणजे सदसद्विवेचनरूप जी उत्कृष्ट शक्ति परमेश्वरानें मनुष्याचे ठायीं ठेविली आहे तिचा व्यापार या अज्ञानजन्य भ्रमानें कांहींसा कुंठित होतो. शिवाय, व्यवहारांत याचे योगानें अनेक हानि झाल्या आहेत व होत आहेत. स्पार्टन व आथीनियन लोकांचा वृत्तांत वर एक लिहिलाच आहे. व या शकुनांच्या पायीं लोकांस वरचेवर किती अडल घडते, किती घोटाळा येतो, (?) वगैरे गोष्टी विशेषेंकरून आमच्या लोकांस सांगण्याची तर मुळींच गरज नाहीं. शकुनांनीं आमची जशी पाठ पुरविली आहे तशी थोड्यांचीच असेल ! आह्मांस त्यांशिवाय इकडच्या इकडे बहुधा हलतांहि येत नाहीं. कोणतेंही काम हातीं घेण्यापूर्वीं तिथि, वार, नक्षत्रें वगैरे काय ह्मणतात तें अवश्य समजून घ्यावें लागतें; आणि त्यांचा रुकार पडला तर सगळ्या गोष्टी. करावयाचें काम कितीही निकडीचें असलें तरी वरील सल्ला अगोदर घ्यावा तेव्हां तें करावयास लागावें. कधीं नवानवशानें सद्बुद्धि सुचून एकादा बेत आरंभण्याचें आह्मी मनांत आणणार, तों चमत्कार पहा,—त्या दिवशीं आपला शुक्रवार ठेवलेला ! आमच्या देशांत जागोजाग ज्या सभा, मंडळ्या, समाज वगैरे खंडोगणती उत्पन्न होतात, आणि लवकरच चोहोंकडे सामसूम होतें, त्यांस वरील वाराची तर बाधा होत नसेल ना !—तसेंच आमच्यांतील कोणी बहादर एकाद्या बड्या कामास बाहेर पडले, आणि

पुढें जातात तों सुळकन् या घरांतलें मांजर निघून त्या घरांत गेलें, कीं फिरला मोर्चा मागें ! कार्य जेमतेम करून होण्यासारखें असलें तरी त्या अपशकुनाचा धाक सारखा मनांत राहून हातच कामाला नीट वाहायाचा नाहीं; कां कीं मनास पक्की गांठ मारून गेलेली, कीं निघतांच वेटें मांजर आडवें निघून गेलेलें आहे, तें कसचें काम होऊं देतें ! याप्रमाणेंच कोठें निघालें तर तिघांनीं जाऊं नये; आपल्या ठिकाणीं नवव्या दिवशीं परत येऊं नये; एका घरांतून निघून दुसऱ्यांत जायचें, परगांवीं जायचें, वगैरे हरएक लहान मोठ्या प्रसंगीं शुभाशुभ योग अवश्य साधले पाहिजेत; अशा प्रकारच्या नानाविध निरर्थक निर्बंधांनीं वेळ, पैसा यांचा व्यर्थ व्यय होऊन कार्यास पुष्कळ वेळां मोठाच व्यत्यय घडतो, आणि वेडेपणाचीं शुष्क भयें मनांत माजतात.

८. पण वरील प्रकार नुसता मूर्खपणाचाच झाला. याहूनही उद्वेगकारक जे शकुनांचे आणखी परिणाम घडून येतात ते सांगायाचेच आहेत. ते असे. जोंपर्यंत शकुन हे पशुपक्ष्यादिकांवरच असतात तोंवर मोठीशी वाईट गोष्ट झाली असें ह्मणतां येत नाहीं. घुबड, पिंगळे वगैरे पक्षी; किंवा मांजर, गाढव वगैरे जनावरें यांचा मनुष्यानें कितीही त्रास मानला, तरी त्यांत त्यांचें कांहीं वाईट नसतें; ह्मणजे त्या योगानें त्यांस मनुष्यापासून उपद्रव पोंचतो किंवा त्यांची मानहानि होते असा कांहींच प्रकार घडत नाहीं. पण प्रत्यक्ष मनुष्याकडेच जेव्हां हें शुभाशुभत्व येतें, तेव्हां वरील मनुष्याच्या अंगभूत मूर्खत्वाचा व उद्धटपणाचा कळस होतो. ह्मणजे मनुष्यजातींतच एकानें दुसऱ्यास विनाकारण भ्रष्ट, अपशकुनी, अमंगळ असें मानावें हें अत्यंत लज्जास्पद होय. धर्माधर्मांत व राष्ट्राराष्ट्रांत हा वेडगळ निंद्य प्रकार किती आहे हें सर्वांस माहीत असेलच. तसाच हा अगदीं प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. ग्रीक लोक एकंदर साऱ्या राष्ट्रांस ‘ बार्बेरियन्स् ’ ह्मणजे रानटी समजत, आमचे पूर्वज सर्वांस म्लेंछ ह्मणत, तसेंच सांप्रतकाळीं इंग्रेज लोक व त्यांचे धर्मपुत्र जे आमच्या देशांत कित्येक आहेत त्यांच्या मतें सारी सुधारणा काय ती इंग्लंडांत नेऊन सांठविली आहे ! पण याहीपेक्षां धर्माच्या हेकटपणानें जें पिसें अंगांत शिरतें त्याची तर कांहीं सीमा आहे ! प्रत्येकाच्या मतें बाकीचे लोक सर्वथा अपवित्र व पापरूपी होत. मुसलमान इतर धर्माच्या कोणत्याही लोकांशीं गांठ पडली असतां ‘बिसमिल्ला रहिमान्’ वगैरे एकादें

कुराणांतील सूक्त ह्मणून आपणास त्या पापापासून धुवून काढील; हिंदूस तर तसें प्रत्यक्षच करावें लागेल; आणि मनुष्यमात्राचें बंधुत्व मानणारा व केवळ दयेचा सागर जो तो ख्रिस्ती धर्म पाळणारास परधर्मी लोकांचा विटाळ उडविण्यास आंगावर पवित्र क्रूस* काढावा लागेल! आमचे शेवटले बाजीराव पेशवे दहा घटका दिवस येईपर्यंत मुसलमानाचें तोंड पहात नसत; आणि त्यांचेच बंधु माजी गायकवाड खंडेराव महाराज हे ब्राह्मणाच्या दर्शनाचा अपशकुन मानीत! या दिग्विजयी समशेर बहादुरांनीं शेवटीं शेवटीं आपल्या † वंशाचा धर्म सोडून ते अगदीं इमाम बनले होते व साठ लक्षांची एक रत्नखचित चादर मकेस पाठविण्याकरितां

---

* वरच्या गोष्टीची येथें अमळ स्पष्टता केली पाहिजे. आमच्या देशांत जेवढे ख्रिस्ती दृष्टीस पडतात, त्यांपैकीं कोणीही वर सांगितलेला क्रूस काढीत नाहींत हें खरें आहे. पण ख्रिस्ती धर्माचें मूळचें खरें स्वरूप, यांचे ठायीं जें दृष्टीस पडतें तें नव्हे. ब्राह्मपंथांतील किंवा प्रार्थनासमाजांतील लोक जसे खरे ब्राह्मण नव्हेत, तसेच प्रॉटेस्टंट पंथांतलेही खरे ख्रिस्ती नाहींत. खरा ख्रिस्ती ह्मटला ह्मणजे स्पेन देशांतला किंवा रोम शहरांतला भाविक क्याथलिक. त्यांचे आचार वर सांगितल्या प्रकारचेच आहेत. सर वॉल्टर स्कॉटच्या 'ऐव्हेनो' नांवाच्या कादंबरींत वरील क्रूसाचा प्रकार आढळतो. यहुदी लोकांच्या केवळ दर्शनानेंही विटाळ होऊन त्यांनीं (कित्येक पात्रांनीं) वरील 'विष्णवे नमः' चा प्रकार केला आहे!

† वरील शब्द वाचून आमच्या ख्रिस्ती बंधूंस आमची केवळ पोरबुद्धि वाटून हसूं येईल हें आह्मीं जाणतों! पण, गेल्या महिन्याच्या अंकांत त्यांच्या एका बंधूनें निबंधमालेच्या आठव्या अंकावर जी एक ताण झाडली आहे ती पाहिली असतां त्यांस हंसण्यास फारशी जागा राहणार नाहीं. सदरील अंकांत त्या पुस्तककारानें आमच्यावर कृतघ्नत्वाचे वगैरे जे आरोप ठेवले आहेत ते कांहीं अपूर्व आहेत! आणि त्या सर्वांत एक तर फारच भयंकर आहे:—कोणता? तर 'जो धर्म आपली महाराणी अंतःकरणपूर्वक पाळीत आहे त्याची मनास वाटेल तशी निंदा' आह्मीं केली आहे!! आमच्या मालकामाअझमा महाराणीच राज्यवैभव ख्रिस्ती धर्मास बळकटी आणण्यास कसें उपयोगी पडलें व आमच्या दयाळू राज्यकर्तीनें आपला १०५८ सालचा जाहिरनामा रद्द करून मिशनरींस व बाटग्यांस मात्र तोंड सोडण्यास कोणत्या आग्रहानें मुभा दिली हें आह्मांस माहीत नाहीं. एकंदरींत आह्मांस याचें फारच आश्चर्य वाटतें कीं, जे दोहों धर्मांची परस्पर तुलना करून आपखुषीनें ख्रिस्ती झाले, ज्यांनीं गेलीं वीस वर्षें त्या धर्माच्या सत्यतेचा जातीनें अनुभव घेतला व त्याविषयीं सतत विचार

त्यांनीं तयार केली होती हीही गोष्ट सर्वांस मशहूर असेलच. त्यांच्या ब्राह्मणद्वेषाची व एकंदर स्वभावाची एक चमत्कारिक गोष्ट येथें लिहिल्यावांचून राहवत नाहीं. एके दिवशीं सकाळीं खासा स्वारी शिकारीस निघाली होती. बरोबर त्यांचे मंत्री, भयत भाऊ शिंदे, हे होते. स्वारी शहराबाहेर पडत असतांच रस्त्यांत एक गरीब ब्राह्मण एका बाजूस उभा राहिलेला दृष्टीस पडला. खंडेराव महाराजांची त्याकडे सहज नजर गेली मात्र, तों लागलींच मागें वळून मागल्या हत्तीवर भाऊ शिंदे होते त्यांस महाराज ह्मणाले, " हा दोड ब्राह्मन आमच्या ह्मोरं कां आला? आज चांगली शिकार सांपडली तर बरं, नाहीं तर याला मारून टाकायाचा!" मग उशीर काय? लागलींच त्या भटजीस पकडून भाऊंनीं आपल्या कांहीं लोकांबरोबर त्यास वाड्यांत पाठवून दिलें. पण त्याबरोबर त्या लोकांस हळूच असेंही सांगितलें कीं, आपल्या शिकारखान्यांतला एक वाघ काढून त्याला लवकर आमच्या अगोदर शिकारीच्या वाटेवर एका जाळींत दडवून ठेवा. त्याप्रमाणें त्या लोकांनीं केलें. अंमळशानें महाराजांची स्वारी तेथून जाऊं लागली तों भाऊंनीं तो वाघ दाखविला. मग काय? तावडतोब मर्जी सुप्रसन्न होऊन उद्गार निघाला, " कां भाऊ! बाह्मन लई पायगुणाचा, शिकार तर अशीं पहिल्या सपाट्यास घावली!" नंतर भाऊंनीं सुचविलें कीं, आतां परत गेल्यावर त्या ब्राह्मणाला कडीं, कंठी घातली पाहिजेत. त्यास महाराजांचाही रुकार पडून स्वारी माघारी आल्यावर जो ब्राह्मण अगदीं घाबरून जाऊन मरणाची वाट पाहत होता त्याची एकदम वरील संकल्पाप्रमाणें मोठी संभावना झाली!! असो तर धर्माच्या हेकटपणानें असे विचित्र प्रकार घडून येतात.

---

केला, ज्यांनीं आमचे बिचारे शास्त्री, पुराणिक यांस केव्हांच वाशांत हड्डून त्यांच्या धर्माची असत्यता त्यांच्या पदरांत घातली, व तेव्हांपासून आह्मां पापी लोकांच्या हृदयांत सत्याचा व ज्ञानाचा उजेड पाडणाऱ्या मंडळींत जे प्रमुख आहेत, त्यांनीं खऱ्या धर्माविषयीं चांगलीं सबळप्रमाणें आह्मांस मुळींच न दाखवितां 'बाबावाक्यं प्रमाणम्' या महावाक्यावरच सरते शेवटीं आणून काय तें थडकाविलें! एकून जसा प्रभु बदलेल तसा त्याबरोबर धर्माचा खरेपणाही बदलतो असें आमच्या 'सत्यदीपिका' कारांचें ह्मणणें झालें! ह्मणजे मोंगलाचें राज्य होतें तोंवर महंमदी धर्म खरा, पेशव्यांचें होतें तोंवर ब्राह्मणधर्म खरा, आणि आतां महाराणींचें झालें ह्मणून ख्रिस्ती धर्म खरा! वाहवारे सत्य आणि वाहवारे दीपिका!!

९. आतां विशेषतः आपल्याच लोकांत चालू असणारे कांहीं प्रकार येथें सांगतों. पहिला मोठा अपशकुन विधवा स्त्रियांचा. या करुणास्पद विपदाविषयीं क्षणभरही विचार करतांना ज्याचें हृदय अत्यंत खेदानें व संतापानें व्याप्त होऊन जात नाहीं त्यास केवळ पाषाणहृदय व अधमाधम ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. स्त्रियांचें जिणें मुळींच पराधीन असल्यानें व संसारदुःखाचें मोठें ओझें त्यांच्यावरच नेहमीं असल्यानें त्यांची स्थिति एकंदरींत कठीणच; पण त्यांतूनही वैधव्याच्या योगानें त्यांचा सगळाच आधार जेव्हां एकदम तुटतो तेव्हां त्यांच्या विपत्तीची पराकाष्ठाच होते. त्यांतही आमच्या देशांत जी त्यांची स्थिति दृष्टीस पडते तीहून दुःखास्पद अशी स्थिति थोडीच! इतरांस दुःखाची स्थिति प्राप्त झाली असतां ते लागलेच सर्वांच्या दयेस व मैत्रीस पात्र होतात; पण तेंच सगळें वरील अनाथ प्राण्यांच्या ठायीं विपरीत होतें. ज्या वैधव्यदुःखाची वेदना सहन न होऊन विचाऱ्या स्त्रियांनीं दुष्ट दुष्ट कसाही नवरा असला तरी आपल्या पातिव्रत्यधर्मास जागून अंगावर शहारा येणाऱ्या रीतीनें त्याच्या चितेवर आपल्या देहाची आहुति द्यावी, किंवा तसें न झालें तर आमरणांत त्याच्याकरतां केवळ तपस्व्याच्या वृत्तीनें राहावें, त्याच महादुःखाबद्दल त्यांचा कळवळा कोणास येत नाहीं इतकेंच नव्हे, तर त्यांच्याच प्रारब्धदशेचें तें फळ असें ह्मणून त्यांचा उलटा छळच होण्यास आरंभ होतो. हा प्रकार आमच्या देशास अत्यंत लांछनरूप होय यांत संशय नाहीं. असो; या संबंधें जितकें लिहावें तितकें थोडेंच. प्रस्तुत स्थलीं इतकेंच सांगतों कीं, ज्या अपशकुनाच्या प्रकारासंबंधें सध्यां आह्मी लिहीत आहों तो सर्वथा व्यर्थ आहे हें तर आहेच पण शिवाय तो मानणें हें विपद्ग्रस्त मानवी प्राण्याचा उपमर्द करणेंही होय. केवळ देवयोगानें किंवा यदृच्छेनें प्राप्त होणाऱ्या स्थितिविशेषावरून मनुष्यास मंगळ किंवा अमंगळ मानावें हा केवढा अन्याय आहे! स्त्रियांचें वैधव्य हें जर त्यांच्या अशुभत्वास कारण, तर बाप, भाऊ, बहीण वगैरे कोणी मेल्यानें त्यांच्या नातेवाईकांचें तरी कां तोंड बघावें? पण मुळींच हा केवढा मूर्खत्वाचा प्रकार आहे! जी अत्यंत सदाचरणानें आपलें आयुष्य क्रमून आपल्या कुलास तर काय पण सगळ्या मनुष्यजातीस भूषण आणीत आहे,—कारण मनुष्याचें अंतःकरण स्वभावतःच किती अस्थिर व दुष्ट असतें हें सर्वप्रसिद्धच आहे,—त्याच साध्वीचें दर्शन पुरते तेरा दिवसही जाऊं न

देतां जो निर्लज्ज व विषयांध पुनः नवरा मुलगा होऊन उभाच अशा पुरुषानें अशुभ मानावें हा केवढा उलटा न्याय!! आणि अशा निष्पाप स्त्रीचें दर्शन जर शुभ नव्हे, तर सगळ्या कपाळभर जिनें कुंकवाचा पट्टा ओढला आहे अशा एखाद्या नगरभवानीचें अथवा उभयकुलांस आणि अवघ्या मनुष्यजातीस जिनें स्त्रियांचें सहज भूषण जी लज्जा ती समूळ टाकून देऊन काळोखी आणली अशा बाजारबसवीचें तिच्या केवळ बाह्य वेषावरून अत्यंत शुभ दर्शन झालें काय? असो; तर याप्रमाणें सुविचारानें दिसणारा मार्ग आणि जगाचा धोपट मार्ग या दोहोंत अनेक वेळां इतकें अंतर असतें. यासारखेच दुसरेही वेडगळ अपशकुन. कोणी दाराबाहेर पडतो आहे इतक्यांत पुढें जर बोडका ब्राह्मण आला तर खुंटलेंच त्याचें जाणें!—मग हा ब्राह्मण चांगला सत्पात्र, सुशील, सज्जन असाही कां असेना! पण तोच जर एखादा महाशंख मोठी शालजोडी पांघरून व मोठ्या लफ्याचा पदर लावून पुढें आला कीं शकुन उत्तम! तसेंच कोणी क्लीबांचेंही दर्शन तसेंच अशुभावह मानतात. हें करणें म्हणजे जें मनुष्याच्या स्वाधीनचें नाहीं त्याबद्दल उगीच विनाकारण त्यास हिणावणें आहे.

याप्रमाणेंच मुळावर आल्याचेंही एक मोठें बंड आहे. एखादें मुलगें जन्मतांच आई किंवा बाप यांतून कोणी मेलें, किंवा दुसरें कोणी कुटुंबांतील मनुष्य गचावलें, कीं आलें तें अपेश त्या बिचाऱ्या पोराच्या माथीं! मग त्या पोराला कोणी चैन पडूं द्यायचें नाहीं. एखाद्या वैऱ्याशीं जसें वागावें त्याप्रमाणें त्या पोराचे सारखे हाल चालायाचे! याहूनही भयंकर प्रकार सुनेचा! ती घरांत आली, आणि सासू, सासरा, नवरा व इतर आप्तसंबंधी हीं सारीं जर पुढें वरींच वर्षे निभावलीं तर ठीक गोष्ट; नाहीं तर मधेंच जर कांहीं विपरीत झालें कीं त्या बिचाऱ्या पोरीचें नशीब उसकटलें! नवऱ्यांची स्वारी दुर्व्यसनी निघून त्यांत जरी पुढें मागें त्यांचा शेवट झाला, तसेंच सासूस, सासऱ्यास वगैरे अशाच स्वतःच्या मूर्खपणानें किंवा आकस्मिक रोगानें मृत्युपंथास लावलें, कीं सारें सूनबाईच्या प्रारब्धाचें फळ! अशा प्रकारचीं उदाहरणें आमच्या सर्व वाचकांस कांहींना कांहीं तरी माहीत असतीलच. यास्तव याविषयीं आणखी विस्तार करण्याची बिलकूल गरज नाहीं. व हा केवढा घोर अन्याय आहे हेंही एखाद्या शुद्ध टोणप्याखेरीज हर्वे त्यास सहज समजणारें आहे.

१०. असो; येथपर्यंत प्रस्तुत विषयावर बराच विस्तार झाला. आतां

हें शकुनाचें वेड केवळ आमच्यांतच आहेसें नाहीं, तर युरोपांतील अगदीं अलीकडच्याही कित्येक मोठमोठ्या नामांकित पुरुषांमध्यें होतें, याचा थोडासा मासला दाखवितों. लॉर्ड् बायरन् ह्मणून इंग्लंडांत सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं एक मोटा नामांकित कवि होऊन गेला. त्यास एके समयीं इंग्लंडाहून पत्र आलें असतां तें फोडण्याच्या अगोदर तो ह्मणाला, "या पत्रांत कांहीं तरी वाईट बातमी मला खास समजायाची आहे." असें ह्मणून त्यानें पत्र फोडून वाचून पाहिलें तों खरेंच! त्या प्रसंगीं त्यानें असा लेख लिहिला आहे:—"काल रात्रीपासूनच मला कांहीं चमत्कारिक वाटत होतें, कीं माझ्या परिचयांतला कोणी मरण पावला, आणि पाहतों तों तसें खरेंच—असा ठोका आल्यावर शकुनांवर विश्वास कसा ठेवूं नये? (सर वॉल्टर) स्कॉट् याचा दिव्य दृष्टीवर * विश्वास असे. रॉसो (फ्रेंच कवि) झाडाच्या बुंधाशीं नेम धरून त्यावरून पाही, कीं मरणोत्तर आपण अक्षय्य नरकांत पडणार कीं नाहीं; गेटी (जर्मन कवि) चाकूवर तोंडाचा वाफारा टाकून पाही, कीं आपण हातीं घेतलेलें काम तडीस जाईल कीं नाहीं!" याच कवीनें दुसरे एके ठिकाणीं लिहिलें आहे:—"माझ्या जन्म दिवशीं पुष्कळ विलक्षण गोष्टी आजपर्यंत घडून आल्या. तसेंच नेपोलियनालाही झालें. आणि मेरी आंटोईनेट (फ्रान्सची राणी) हिला तर एक फारच चमत्कारिक प्रसंग घडून आला. माझ्या लग्नाच्या वेळेस† माझ्या असें अकस्मात् मनांत आलें कीं, मी आपल्या मरणचिठ्ठीवर सही करीत आहे. त्या वेळेस जर मला पळून जातां येतें तर मी तसें करणार होतों. मनःप्रेरणेच्या शकुनावर माझा दृढ विश्वास आहे. सॉक्रेटीसाचा गुप्त यक्ष होता ह्मणून जें ह्मणतात तें खोटें नव्हे; मंक् ल्युईस् यालाही तशीच कोणी देवता अनुकूळ होती; आणि नेपोलियनाला पुष्कळ दैवी सूचना वारंवार होत!" आपल्या लोकांत जसें वारवार मानतात तसाच वरील कवीचा प्रकार होता. तो शुक्रवारीं

---

* दिव्यदृष्टि ह्मणजे पुढें होणाऱ्या गोष्टींचें अगोदर ज्ञान होणें. ही शक्ति कोणाकोणामध्यें असते असें स्कॉटलंडांतील कित्येक लोक मानतात.

† बायरन् कवि आपल्या बायकोशीं भांडून व तिजशीं घटस्फोट करून देशांतरास चालता झाला या गोष्टीवर वर लक्ष्य आहे. या वेळेस तो जो बाहेर पडला तो पुनः स्वदेशास माघारीं आलाच नाहीं.

कोणास भेटावयास जात नसे! असो; याप्रमाणेंच आणखीही पुष्कळ चमत्कारिक गोष्टी सांगतां येतील. हाच बायरन् ज्या वेळेस ग्रीस देशांत मृत्यु पावला त्या वेळेस एक मोठी भयंकर वावटळ सुटली होती; व हाच प्रकार नेपोलियन व क्रॉमवेल् यांच्या मरणसमयीं झाला. जुलियस् सीजर ज्या दिवशीं मारला गेला त्याच्या आदल्या रात्रीं विलक्षणच उत्पात चोहोंकडे झालेले प्लुटार्क् यानें त्याच्या चरित्रांत लिहून ठेवले आहेत. त्यांचें कवितारूप शानदार वर्णन शेक्सपियरच्या प्रसिद्ध नाटकांत आहे. त्यांत सीजरच्या बायकोला कसें स्वप्न पडलें, तिला त्याचें किती भय वाटलें, * व त्याला मारण्यास टपलेल्या लोकांपैकीं एकानें त्याचा लाक्षणिक अर्थ सीजरला कशा चातुर्यानें बनवून सांगितला, हें सर्व ह्या नाटकांत आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांनीं वाचलें असेलच. असो; अशीं उदाहरणें आमच्या इकडे इतिहासांतील मुळींच देतां येत नाहींत; कारण तो लिहिलेलाच नाहीं. तरी टिपू सुलतानाचें एक उदाहरण आहे. श्रीरंगपट्टण घेतल्यावर टिपूचे कागदपत्र जे सांपडले त्यांत त्याचीं स्वप्नें व त्यांचा अर्थ केलेला असा एक लेख सांपडला. त्यांतील एक स्वप्न मोठें चमत्कारिक आहे. मराठ्यांचें लष्कर आपणावर चालून येत आहे हें त्यास माहीत असतां त्यास एकदा असें स्वप्न पडलें कीं, एक तरणा मनुष्य आपणाकडे येऊन आपणापाशीं बोलतो आहे. पण बोलत बोलतां तो मनुष्य बदलून आपणापुढें स्त्री उभी आहे असें त्यानें पाहिलें. या स्वप्नाचा सुलतान साहेबांनीं असा अर्थ केला कीं, मराठे हे पहिल्यानें मोठे शूरसे दिसतील, पण लढाईत केवळ बायकांप्रमाणें नामर्द ठरतील! असो; तर याप्रमाणें मागील निबंधांत भुतावर विश्वास ठेवणारे जसे सांगितले तसेच शकुनांवरही ज्यांचा विश्वास होता असे कित्येक नामांकित पुरुष वर सांगण्यांत आले.

११. वरील उदाहरणांवरून कित्येकांस कदाचित् असें वाटेल कीं, निबंधांत जें आह्मीं प्रतिपादन केलें त्याचें वरील मोठमोठ्या उदाहरणांनींच खंडण होतें. पण असें बिलकूल नाहीं. प्रस्तुत निबंधाच्या अग्रभागीं दुर्योधन महाराज जसें ह्मणताहेत तसेंच आह्मांस वाटतें कीं, शकुनादिकांचा

---

* असाच प्रसंग 'वेणीसंहार' नाटकांत आहे. भानुमतीस एक अत्यंत अशुभ स्वप्न पडून तें तिनें आपल्या नवऱ्यास सांगितलें आहे, निबंधारंभीं दुर्योधनाचीच वरील प्रसंगींची उक्ति होय.

कसलाही ठोका मिळाला तरी ज्या अर्थी तो नियमानें मिळत नाहीं त्या अर्थी तसें केवळ काकतालीयन्यायानें घडतें असेंच ह्मटलें पाहिजे. त्यांवर पूर्ण भरंवसा ठेवला? असें कोणीं विचारल्यास त्यावर आमचें उत्तर इतकेंच आहे कीं, त्यांचा तरी त्यावर अगदीं पक्का विश्वासच होता असें नाहीं. एकाद्या भलत्याच नादास लागून मोठे शहाणेही जसे फसतात तसाच हा त्यांचा केवळ नाद असेल; यापेक्षां कांहीं नाहीं. त्यांची जर त्याविषयीं पक्की खात्रीच झाली असती तर तसें त्यांनीं खचित लिहून ठेवलें असतें, व सबळ प्रमाणें दाखविलीं असतीं. पण वरील गोष्टी तशा बिलकुल नसून त्यांच्या मनानें घेतलेल्या समजुती मात्र त्यांत दाखविल्या आहेत. असो; तर एकंदरींत शकुन वगैरे सर्व निवळ भ्रम आहेत. त्यांवर विश्वास ठेवून कोणींही हर्षविषाद पावूं नये; व त्याचें भयही बिलकुल बाळगूं नये. तुकोबा सांगतातः—

अवघा तो शकुन। हृदयीं देवाचे चरण॥ येथें नसतां वियोग। लाभा उणें काय मग॥ संग हरिच्या नामाचा। शुचिर्भूत सदा वाचा॥ तुका ह्मणे हरिच्या दासा॥ शुभ काळ दाहीं दिशा॥ १॥

---

अंक १७ वा.

चतुरंगबलो राजा जगतीं वशमानयेत् ।
अहं पंचांगबलवानाकाशं वशमानये ॥ *

१. मागील दोन निबंधांत भुतें व शकुन यांविषयीं आह्मीं आपले विचार प्रदर्शित केले. आतां या खेपेस ज्योतिषाविषयीं ह्मणजे ग्रहदशेवर वगैरे जो लोकांचा दृढ विश्वास आढळतो त्याविषयीं लिहूं.

२. प्रस्तुत निबंधांत खऱ्या ज्योतिषाविषयीं—ह्मणजे ज्या आश्चर्यमय शास्त्रांत आपल्या पृथ्वीविषयीं व सूर्यचंद्रादि खस्थ पदार्थांविषयीं यथार्थ निरूपण केलेलें आढळतें, व ज्यासारखें कवीच्या, तत्त्वज्ञाच्या आणि भाविकाच्या मनास आल्हाद देणारें दुसरें कांहीं नाहीं, त्याविषयीं विवेचन कर्तव्य नाहीं. तर त्याचा उदय होण्यास जें भ्रांतिमूलक शास्त्र कारण झालें त्याविषयींच फक्त यांत विचार करावयाचा आहे. ह्मणजे त्याचा उदय कसा झाला, केव्हां झाला, त्याचा सध्यां कितपत प्रसार आहे, त्यांत तथ्य कितीसें आहे, वगैरे गोष्टीच काय त्या सांप्रतच्या निबंधांत येतील.

३. आतां प्रथमतः या शास्त्राचा उदय कसा झाला असावा हें पाहूं. ज्योतिषाची माहिती थोडीबहुत बहुतेक राष्ट्रांत सांपडते; त्यांतून खाल्डियन, मिसरी, हिंदु, चीन वगैरे अत्यंत प्राचीन राष्ट्रांत तर हें शास्त्र पुष्कळच पूर्णावस्थेस येऊन पोंचलें होतें असें समजतें. तेव्हां यावरून आकाशांतील चमत्कारांविषयीं जिज्ञासा व शोधकबुद्धि हीं मनुष्यस्वभावास केवळ साहजिक होत हें स्पष्ट दिसतें. पण बाल्यावस्थेंत असणाऱ्या राष्ट्रांस स्वाभाविक असणाऱ्या ज्या वरच्या दोन मनोवृत्ति त्यांबरोबर त्याच स्थितीच्या अप्रबुद्धत्वास साहजिक जी मनाची भ्रांतिमयता तीही पुष्कळ आढ-

---

* "चतुरंगबलें करून ह्मणजे हत्ती, घोडे, पायदळ इत्यादि चारी अंगें ज्याचीं परिपूर्ण आहेत अशा सैन्याच्या योगानें राजा पृथ्वीस वश करूं शकतो; तसाच मी पंचांगबलेंकरून ह्मणजे पंचांगाच्या जोरावर आकाशास आपल्या सत्तेंत आणतों!"

ळते. ह्मणजे हल्लींच्या काळीं जो कोणी ज्योतिष शिकतो तो तें जसें केवळ त्यांतील प्रमेयांचा बोध व्हावा एवढ्याच हेतूनें शिकतो, तसें प्राचीन काळीं नसून शिकणाराचा उद्देश वरच्याखेरीज आणखी एक निराळाच असे. तो अर्थात् हा कीं, ज्योतिषांत पारंगत होऊन ग्रहफलें वर्तवितां येऊं लागलीं ह्मणजे भावी कालाचें आपणास ज्ञान व्हावें. हा हेतु वरील शास्त्राच्या अध्ययनानें कितपत सिद्ध होतो व कितपत व्हावा याविषयीं पुढें विवेचन करण्यांत येईलच. प्रस्तुत स्थलीं त्याच्या संबंधानें इतकेंच सांगायाचें कीं, मागील काळीं वरील हेतु केवळ भ्रांतिमूलक होय हें सामान्यजनास तर काय, पण मोठमोठ्या विद्वानांसही पक्कें ठाऊक नसे. मागें विवेचन केलेल्या दोन भ्रमांस अनुसरणारे जसे पुष्कळ असत तसेच यावर पूर्ण भरंवसा ठेवणारेही होते. असो; तर याप्रमाणें वरील समज सर्वांचा होऊन गेला असल्यामुळें प्राचीन काळीं ज्योतिषाचे ज्ञान करून घेण्याची उत्कंठा व त्यांत नवे नवे शोध लावण्याची हौसही पुष्कळ लोकांस असावी यांत संशय नाहीं. आणि यात्र दोन्ही गोष्टी प्रस्तुत शास्त्राच्या उदयास कारणभूत झाल्या असाव्या. असें नसतें तर तादृश ज्ञानसंपन्न नसणाऱ्या राष्ट्रांतही या शास्त्राची बरीच माहिती असल्याचें आढळतें ना. पण यावर कोणी कदाचित् अशी शंका घेतील कीं, हें शास्त्र जर केवळ भ्रांतिमयच होय, तर याचा अभ्यास एवढे परिश्रम घेऊन लोक करीत असत हें कसें ? ग्रहांचीं फलें वगैरे गोष्टी सर्व खोट्याच जर असल्या तर त्या समजण्याविषयीं सर्वांनीं एवढा अटाट कशाला केला असता ! या शंकेचें समाधान असें कीं, ज्या वेळेस या शास्त्राचें वर सांगितल्याप्रमाणें मोठ्या हौसेनें लोक आपणास ज्ञान करून घेत त्या वेळेस त्याचें खोटेपण प्रगट झालें नव्हतें. नवग्रह, राशिचक्र, नक्षत्रें वगैरेंची व्यवस्था करून लोक जेव्हां पहिल्यानें गणितें करूं लागले व कुंडल्या मांडूं लागले, तेव्हां तें सर्व खरें आहे अशा समजुतीवरच लोकांत तो प्रचात पडला. अंतरिक्षांतील ग्रहांच्या गत्यादिकांवर इहलोकांच्या संसारादि कृत्यांचा ठोकताळा मिळतो या समजुतीवर ज्योतिष्यांनीं पहिल्यानें नियम बांधले,—कीं अमुक अमुक योग आला असतां त्याचें अमुक अमुक फल प्राप्त व्हावयाचेंच.—हेच नियम पुढें हळूं हळूं विस्तार पावून होता होतां प्रस्तुत काळीं निरनिराळ्या देशांत या विषयावर जे सर्वमान्य ग्रंथ होऊन बसले आहेत ते निर्माण झाले. आणि त्यांवर विश्वास ठेवण्या-

चाही प्रघात पितृपुत्रपरंपरेनें फार दिवसांपासून चालत आल्यानें तोच अजूनपर्यंतही सामान्यतः अविच्छिन्नपणें चालू असलेला आढळतो. तरी प्रस्तुत विषयाविषयीं ज्यांनीं यथार्थपणें विचार केला त्यांस या शास्त्रांतील नियमांचा असंबद्धपणा लक्षांत येऊन ग्रहनक्षत्रादिकांवरचा त्यांचा विश्वास उडाला असें मागील काळच्या इतिहासावरूनसुद्धां पुष्कळ दिसून येतें. अशीं उदाहरणें कांहीं पुढें देण्यांत येतीलच. त्यांवरून आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच कीं, ज्योतिषावर पूर्वींपासूनही सर्वांचाच सारखा विश्वास होता असें नाहीं. हा विश्वास होतां होतां हल्लींच्या काळीं तर सर्व सुधारलेल्या देशांतून बहुतेक नाहींसाच झालेला आहे. असो; तर याप्रमाणें प्रस्तुत शास्त्राच्या असत्यत्वाचें अज्ञान हेंच त्याच्या वृद्धीस कारण झालें; आणि शेवटीं त्यांतला असत्याचा जेवढा भाग होता तेवढा निराळा होऊन खरें जें ज्योतिष तें मात्र आयतें जगांत प्रकट झालें.

वर जो ज्योतिषाचा प्रकार सांगितला तसाच प्रकार रसायनशास्त्र व खनिजपदार्थविषयक शास्त्र यांचाही झाला. तो असा कीं, या शास्त्रांतले शोध करण्याविषयीं लोकांची पहिल्यानें प्रवृत्ति जी झाली ती केवळ भ्रमामुळें झाली, आणि होतां होतां सरते शेवटीं त्यांतून वरील उपयुक्त शास्त्रांचा प्रादुर्भाव झाला. तांब्याचें सोनें करण्याचा रस, लोखंडास घांसल्याबरोबर त्याचें सोनें बनविणारा परीस, काया अमर करणाऱ्या वनस्पति, द्रव्यांजन वगैरे केवळ मनःकल्पित पदार्थ शोधून काढण्याकडे लक्षावधि भ्रांतिष्ट लोकांची प्रवृत्ति झाल्यानें एकंदर जगाचें फार कल्याण झालें, ह्मणजे वरील वस्तु सांपडल्या असें तर नाहीं, पण वरील नादास इतके लोक गुंतल्यामुळें लोकांच्या ध्यानीं मनींही नव्हत्या अशा अनेक गोष्टी उदयास आल्या. उदाहरणार्थ लोहचुंबक घ्या. या खनिज द्रव्याच्या अंगीं केवढे अद्भुत गुण आहेत, व त्यांच्या योगानें जगाचें केवढें अपरिमित कल्याण झालें आहे, या गोष्टी कोणास सांगावयाला पाहिजेत! या एकट्या पदार्थानें जगांत जेवढे चमत्कार झाले आहेत त्यांचा शतांशही परीस खरोखरच सांपडल्यानें झाला असता काय? समजा कीं, इतक्या लोकांच्या वेडेपणाच्या भ्रमाची कींव येऊन देवानें त्यांस परीस सांपडू दिले असते, तर जगांत सध्यां आहे त्याहून कितीशी बदल झाली असती! जो क्षणभर विचार करील त्यास सहज कळून येईल कीं, अपूर्णांकांतील भाजकास आणि भाज्यास सारख्याच केवढ्याही मोठ्या संख्येनें गुणिलें असतां

जसा मुळींच फरक पडत नाहीं, त्याचप्रमाणें सध्यां आहे त्याच्या कोट्यावधिपट सोनें जरी पृथ्वीवर झालेंसें कल्पिलें, तरी तिळमात्रही मनुष्याच्या स्थितींत फेर पडणार नाहीं. वरील अपूर्णांकांत दोन्ही आंकडे वरीक जसे भले मोठे भव्य दिसतील, त्याप्रमाणें घरीं दारीं जिकडे तिकडे सोनेंच सोनें होऊन शिलंगणाच्या दिवसाचा मात्र थाट उडेल; पण त्या खऱ्याखुऱ्या सोन्याची किंमत त्या नामधारी सोन्याहून फार जास्त होणार नाहीं.* असो; तर याप्रमाणें वरील भ्रमांच्या मागें लागतां लागतां मनुष्यास खऱ्याखुऱ्याच मोठमोठ्या वस्तूंचा लाभ झाला; तसा त्या भ्रमात्मक पदार्थांच्या प्राप्तीनेंही होताना. हा सगळा प्रकार मृगजळाचा पाठलाग करतां करतां खरीखुरीच एकादी चांगली नदी लागल्याप्रमाणें होय; किंवा इसापनीतींतील शेतकऱ्याच्या लेंकांच्या सारखा होय. त्यांनीं ज्याप्रमाणें शेतांत ठेवा मुळींच नसतां तें शेत चोहोंकडून चांगलें पोंखरलें, आणि सरतेशेवटीं बापाचें डबोलें जरी सांपडलें नाहीं, तरी शेताचें पीक फार होऊन त्यांची भरपाई झाली; त्याप्रमाणेंच वरील भ्रमांनीं वेडे होऊन लोक हिंडतां हिंडतां त्यांस वरील शास्त्रांतील कित्येक गूढ रहस्यें कळून येऊन त्यांचा क्रमाक्रमानें जगांत प्रसार झाला.

४. वर प्रस्तुत शास्त्राची उत्पत्ति व प्रसार कसा झाला याविषयीं लिहिलें. आतां त्याचा पूर्वापारपासून प्रचार कसा चालत आला आहे तो

---

* अमेरिकेचा शोध लागून तेथील सोन्याच्या खाणी जेव्हां स्पेन देशाच्या ताब्यांत आल्या, तेव्हां कित्येक वर्षेंपर्यंत सोन्याचा भाव पुष्कळ उतरला होता ही गोष्ट अर्थशास्त्रप्रसिद्ध आहे. तशीच लंकेंत गेलेल्या न्हाव्याचीही गोष्ट आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस कदाचित् माहीत असेलच. ती अशी कीं, कोणी एक न्हावी लंकेंतील सोन्यांच्या विटांची कीर्ति ऐकून तेथें आपलें कसब चालण्याकरतां गेला. मग पहिल्याच हजामतीस एकदम पांच विटा मिळालेल्या पाहून त्यानें मनांत आणलें कीं, आतां बरें झालें, जन्माची दगदग चुकली! याप्रमाणें मनाचे मांडे यथेच्छ खातो आहे इतक्यांत बायकोनें येऊन सांगितलें कीं, घरांत दाणे नाहींत. त्यानें उत्तर केलें कीं, आतां कोणत्याही गोष्टीची ददाद नाहीं, आजच्या पांच विटा आपल्याच जन्माला तर काय, पण आपल्या पाठीमागेंही पिढ्यानपिढ्या पुरण्यासारख्या आहेत! अशा घमेंडींत स्वारी बाजारांत जों गेली तों शेरभर दाण्यांत चार विटा एकदम खाडदिशीं गेल्या!—सारांश, सोन्याची आणि संपत्तीची वस्तुतः एकात्मता नाहीं; आहे ती केवळ त्याच्या वेरल्यावरूनच होय.

पाहूं. मागें सांगितलें आहेच कीं, या शास्त्राची माहिती फार प्राचीन काळच्या राष्ट्रांसही होती; तेव्हां त्यावरून स्पष्ट आहे कीं, ग्रहनक्षत्रादिकांचें माहात्म्य तेव्हांपासून चालत आलें आहे. आणि अलीकडच्या काळापेक्षां तो मागला काळच कोणत्याही प्रकारचा विश्वास विशेष दृढ बसण्यास पुष्कळ कारणभूत होता हें उघड आहे. कारण एक तर दिवसेंदिवस जगांत ज्ञानाचा अधिकाधिक प्रसार होत चालला आहे, तेव्हां समंजसते-च्या संबंधानें पूर्वीच्या काळाला व आतांला पुष्कळच फेर आहे. दुसरें असें कीं, दिवसांदिवस मनुष्य अधिक शहाणें व लबाड होत चालल्या-मुळें पूर्वीच्यासारखा भोळेपणा व भाविकपणा आतां कोठेंही राहिला नाहीं. तिसरी गोष्ट अशी कीं, प्राचीन काळीं अर्वाचीन काळाइतकें सृ-ष्टिज्ञान चोहोंकडे फैलावलें नसल्यामुळें सृष्टींत कांहीं उत्पात किंवा अपूर्व चमत्कार एकाएकीं घडून आले असतां मागल्याप्रमाणें आतां लोक भय-भीत होऊन जात नाहींत. ज्या गोष्टींचें आतां कोणास कांहींही वाटत नाहीं त्यांचाच पूर्वीच्या लोकांस केवढा धाक वाटत असे हें पाहून मोठी मौज वाटते! ग्रीस देशच्या इतिहासांत अशी एक गोष्ट लिहिलेली आढ-ळते कीं, एशियामैनर प्रांतांत पूर्वी लिडिया आणि मिडिया नांवाचीं दोन राज्यें होतीं. यांचीं निकट संबंधामुळें वरचेवर परस्पर युद्धें होत. एकदा असें झालें कीं, दोन्ही पक्षांचीं दळें समरंगणांत समोरासमोर उभीं राहून आतां चकमक उडावी इतक्यांत सूर्यास ग्रहण लागून खग्रास पडत चाल-ला. होतां होतां पूर्ण ग्रास होऊन सगळ्या रणभूमीवर ठिकर काळोख पडला. नक्षत्रें पुनः दिसूं लागलीं, पशुपक्ष्यादि प्राणिजात व वनस्पतिवर्ग हीं एकाएकीं भयचकित झाल्यासारखीं होऊन क्षणभर व्यापारशून्य व स्तब्ध झालीं. संपूर्ण सृष्टि अतिशयित उदास व भयाण वाटूं लागली. सारांश, तो अपूर्व देखावा पाहून दोहों पक्षांचे वीर भयानें अगदीं गडब-डून गेले, आणि आपणांवर ईश्वराचा अत्यंत क्षोभ झाला असें मानून दोन्ही सैन्यांनीं युद्धाचा संकल्प तत्काळ सोडून दिला आणि तीं परत आप-आपल्या स्थळास गेलीं.* कोलंबसाविषयींही अशी एक गोष्ट वाचण्यांत

* सूर्याचें खग्रास ग्रहण इतिहासप्रसिद्ध असणारें असें हें पहिलें होय. हें इ० सनाच्या पूर्वी ५८४ व्या वर्षी घडलें. हेंच ग्रहण थेल्सनामक ग्रीक पंडितानें आधीं वर्तवून ठेविलें होतें. यावरून वरील दोन प्रांतांतील लोकांपेक्षां त्या वेळींही ग्रीक लोक अधिक ज्ञानसंपन्न होते हें स्पष्ट दिसतें.

आली आहे कीं, तो अमेरिकेजवळील एका बेटांत असतां लवकरच चंद्र-ग्रहण होणारें आहे असें जाणून तेथील लोकांस आपले अगदीं आज्ञांकित करून टाकण्याचा त्यानें त्या ग्रहणावरून बेत योजला. तो असा कीं, ते लोक आपणास पूर्वीप्रमाणें न भजतां आपली अंमळ अवज्ञा करूं लागले असें पाहून त्यानें त्यांच्या मनांत दहशत बसण्याकरितां त्यांस असें कळविलें कीं, तुमची वर्तणूक अलीकडे अगदीं गैर होत चालली आहे तर मी याबद्दल देवाच्या कानावर घालून तुह्मांस शासन करवीन. अशी त्यांस धमकी देऊन ग्रहणाच्या दिवशीं त्यानें त्यांस सांगितलें कीं, तुह्मी अजून माझें ऐकत नाहीं, तर पहा आज रात्रीं मी आपलें सामर्थ्य तुमच्या चांगलें टळटळीत प्रत्ययास आणून देतों. मग पौर्णिमेचा चंद्र नेहमींप्रमाणें अत्यंत देदीप्यमान उगवला असतां कांहीं वेळानें तो काळा होत जातांना जेव्हां त्या बेटांतील लोकांनीं पाहिला, तेव्हां त्यांस मोटी धास्ती पडून ते कोलंबसापाशीं मोठ्या नम्रपणानें आले, आणि त्याच्या पायां पडून आपल्याबद्दल देवापाशीं रदबदली करण्याविषयीं ते त्याची विनवणी करूं लागले. कोलंबसानें त्यांचें बोलणें मान्य करून सांगितलें कीं, जर तुह्मांस खरोखरच पश्चात्ताप झाला असेल तर तुमचें संकट दूर करण्याविषयीं मी पुनः देवाची प्रार्थना करतों. असें ह्मणून तो प्रार्थना करण्याचे निमित्तानें आपले खोलींत एकांतीं गेला. मग कांहीं वेळानें सृष्टिनियमाप्रमाणें ग्रहण सुटलेंच; पण तें कोलंबसाच्या योगानें झालें अशी त्या अडाणी लोकांची खात्री होऊन तेव्हांपासून ते कोलंबसास पुष्कळच मान देऊं लागले. असो; तर याप्रमाणें सूर्याच्या व चंद्राच्या ग्रहणांची वास्तविक उपपत्ति माहीत नसल्यामुळें प्राचीन काळीं त्यांचें लोकांस एवढें भय वाटत असे. असाच प्रकार धूमकेतूंचा. हे तर वरील ग्रहणांहूनही क्वचित् येणारे असल्यामुळें व त्यांचा आकारही मोठा विचित्र असल्यामुळें यांचा वरच्याहूनही लोकांस धाक पडे. हीं शेंडींनक्षत्रें आकाशांत दिसूं लागलीं कीं, देशांत दुष्काळ सांतो, लढाया, धरणीकंप वगैरे प्रलय कांहीं तरी व्हावयाचेच अशी साऱ्या जगाची समजूत होऊन बसली आहे. असो: तर याप्रमाणें सृष्टींतील चमत्कारांचें यथावत् स्वरूप मागील काळच्या लोकांस समजत नसल्यामुळें. ज्योतिषावर वगैरे त्यांचा सर्वथैव निर्धार असे. शिवाय दुसरें असें कीं, ज्योतिषांतील कांहीं भागांची ह्मणजे ग्रहणांचीं वगैरे लोकांस नेहमीं बरोबर प्रचीति येत असे; तेव्हां इतर भागांसही त्याप्रमाणेंच खरें मानणें त्यांस भाग

पडे. आतां जसा त्या शास्त्रांतील खऱ्या खोट्या भागांचा साफ निकाल झालेला आहे तसें पूर्वीं नसल्यामुळें संदेहात्मक भागावरही लोकमतें निश्चयात्मकताच येत असे. तर याप्रमाणें प्राचीन काळीं ग्रहनक्षत्रादिकांच्या शुभाशुभत्वावर लोकांचा पक्का विश्वास बसून राहिला होता. आणि पुढें हळूं हळूं धर्मांत व लोकव्यवहारांत ज्योतिष शिरून मुहूर्तांचा वगैरे जेव्हां विचार होऊं लागला, तेव्हां वरील विश्वासास तर अधिकच बळकटी आली. ती अशी कीं, वरील विश्वास हें धर्माचें व लोकाचाराचें एक कलमच बनून जाऊन त्याचा अभाव हें नास्तिकपणाचं व तऱ्हेवाईकपणाचें चिन्ह झालें. असो; तर ज्योतिषाचें प्राबल्य सर्व जुन्या राष्ट्रांत जें इतकें माजलें त्याचीं कारणें वर सांगितल्याप्रमाणें होत. हें प्राबल्य अजूनही सर्वथैव मोडलेंसें म्हणतां येत नाहीं. सुधारलेले म्हणविणाऱ्या देशांतूनही वरील प्रकार आढळतात. आणि त्यांतून आमच्या देशांत तर कांहीं विचारूंच नये ! विद्वान्, अविद्वान् वगैरे सर्व लोकांचा प्रस्तुत विषयावर केवढा विश्वास आढळतो, व त्याचा प्रचार किती बारीक गोष्टींपर्यंत गेलेला आहे याची माहिती आमच्या वाचकांपैकीं कोणासही नवी द्यावयास पाहिजे असें नाहीं.

९. एथपर्यंत प्रस्तुत विषयाचें उपोद्घातरूपानें कांहीं विवेचन झालें. आतां मुख्य विषयाविषयींच विचार करूं;—म्हणजे ज्योतिषाची लोकभ्रमांत कां गणना केली याचीं कारणें लिहितों. हें करण्याच्या अगोदर पुढील प्रतिपादनावर येणाऱ्या एका आक्षेपाचें निवारण केलें पाहिजे. तो हा कीं, यापुढें ज्योतिषाच्या विरुद्ध जें आम्ही मत देणार तें त्या विषयावरील ग्रंथ वाचल्याशिवाय अगोदरच देण्यास आम्हांस अधिकार काय ? 'मुहूर्तमार्तंड,' 'बृहज्जातक' वगैरे ग्रंथांचें यथास्थित अध्ययन करून त्याप्रमाणें गणितें करून त्यांचा ठोका जेव्हां पहावा तेव्हां मग त्यांच्या खरेखोटेपणाविषयीं बोलावें. आधीं बोलण्यांत काय जीव ? असा वाद जर कोणी प्रस्तुत विषयाचे कैवारी घेतील तर त्यांस आमचें उत्तर असें आहे कीं, मागील दोन खेपेस जसे आम्ही भूतविद्या किंवा शकुनविद्या न शिकतां केवळ चारचौघांच्या समजुतीवरून अभिप्राय दिले त्याचप्रमाणें प्रस्तुत विषयींही होण्यासारखें आहे. म्हणजे आकाशांतील गोलांच्या गतींवर मनुष्यास होणाऱ्या इष्टानिष्ट गोष्टींचें बस्तान असण्याचा संभव किती, व ज्योतिषांनीं केलेल्या गणितांचा ठोकताळा किती वेळां बरोबर

उतरतो. या दोन गोष्टींचा शोधक बुद्धीनें जो अंमळ विचार करील त्यास प्रस्तुत विषयावर निर्णय देण्यास फार आयास पडणार नाहींत. आणि हा निर्णय कोणीं मनुष्यानें वरील ज्योतिषग्रंथ मुळींच न पाहतां जरी दिला, तरी तसें असल्यानें त्याच्या निर्णयास यत्किंचित्ही दुर्बलत्व येणारें आहे असें नाहीं.

६. तर आतां वरील दोन गोष्टींविषयीं यथानुक्रम विचार करूं. पहिली गोष्ट ही कीं, अंतरालांतील गोल आणि या आपल्या गोलावर जीं आपण मनुष्यें आहों यांचीं संसारकृत्यें यांचा परस्पर कांहीं संबंध आहे कीं नाहीं? अशा प्रश्नांवर निश्चयात्मक उत्तर देणें फार कठीण आहे; का कीं, सगळ्या सृष्टीचा परस्पर किती संबंध आहे किंवा मुळींच नाहीं वगैरे गोष्टीविषयीं अल्पज्ञ जो मनुष्य त्यास कसें ज्ञान व्हावें? या सर्व गोष्टी एका सृष्टिकर्त्यास मात्र माहीत! असो; पण एवढें खरें आहे कीं, असा जर कांहीं विचित्र संबंध असलाच, तर तो मनुष्यास कळण्याचा बिलकुल मार्ग नाहीं. आणि हल्लीं जे संबंध ज्योतिषग्रंथांत लिहून ठेवले आहेत ते केवळ काल्पनिक होत. ह्मणजे ग्रहनक्षत्रादिकांचा अमुक अमुक योग आला असतां अमुक अमुक व्हावें असें तशी गोष्ट केवळ यदृच्छेनें एक दोन वेळां घडली असतां, ज्योतिषकारांनीं लिहून ठेविलें असावें इतकेंच दिसतें. याच्या पलीकडे तसल्या नियमांत कांहीं तथ्य नाहीं. याखेरीज दुसऱ्याही आणखी कित्येक गोष्टी मनांत येतात, कीं ज्यांवरून अमुक अमुक ग्रह आला असतां अमक्या अमक्या मनुष्यास वाईट वगैरे सर्व निवळ भ्रांति आहे अशी खात्री होते. पहा कीं, आपल्या भाषेंतील ह्मणी-प्रमाणें दररोज सव्वा लक्षाची घडामोड आहे, ह्मणजे प्रतिदिवशीं लाखों मनुष्यें जन्मास येत आहेत आणि लाखों मरण पावताहेत. आतां या लाखामध्यें अगदीं त्याच पळास किंबहुना विपळास जन्मलेलीं मनुष्यें कितीं सांपडतील बरें? समजा कीं, आपण एक विवक्षित काळ धरला, आणि त्याच काळीं अगदीं बरोबर जन्मास आलेलीं एक दहा हजार मनुष्यें घेतलीं. आतां ज्योतिषविद्येच्या सिद्धांताप्रमाणें ह्मटलें ह्मणजे या दहा हजार मनुष्यांचे जन्मकाळचे योग अगदीं सारखे असल्यामुळें त्यांस पुढील संसारांत सारख्याच बऱ्या वाईट गोष्टी घडून त्या सर्वांची आयुष्यमर्यादाही अगदीं सारखी असायास पाहिजे. पण अशी प्रचीती कधीं येते काय? अमुक अमुक दोन मनुष्यांस सारख्याच विपत्ति आल्या व

सारखींच सुखें प्राप्त झालीं असें कधीं कोणाच्या ऐकण्यांत आलें आहे ? ज्यास त्यास बहुतकरून ज्याच्या त्याच्या बऱ्या वाईट कृतीप्रमाणें बरें वाईट परिणाम आजपर्यंत घडत आले आहेतच. जी रास व जें नक्षत्र एकास रंकाचा राजा करतें, तीच रास व तेंच नक्षत्र दुसऱ्यास राज्यपदावरून खालीं ढकलून देतें. तेव्हां यावरून हें स्पष्ट दिसत नाहीं काय, कीं ज्या अर्थी वरील नक्षत्रांपासून व नक्षत्रराशींपासून एकेच प्रसंगीं अशीं परस्परविरुद्ध कार्यें घडतात त्याअर्थी त्या प्रसंगीं त्यांवर कारणत्वाचा आरोप करणें हें केवळ असमंजस होय !

इंग्रेजी ज्योतिषाची—ह्मणजे प्राचीन काळच्या ज्योतिषावर इंग्रेज वगैरे लोकांनीं अलीकडे जे पुष्कळ नवे नवे चमत्कारिक शोध केले आहेत त्यांची—ज्यांस माहिती असेल त्यांस प्रस्तुत विषयावर आणखीही कांहीं चमत्कारिक आक्षेप काढतां येतील. ते असेः—आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस बहुधा माहीत असेलच कीं, गेल्या शंभर वर्षांत पुष्कळच नव्या ग्रहांचा शोध लागला आहे. इ० स० १७८१ सालापर्यंत साऱ्या जगास माहीत असलेले ग्रह ह्मटले ह्मणजे बुध, शुक्र, मंगळ, गुरु आणि शनि असे पांचच काय ते होते. पण तेव्हांपासून आजपर्यंत एकामागून एक असे नवे ग्रह सांपडतां सांपडतां सध्यां त्यांची संख्या शंभरावर गेली आहे; आणि यापुढें आणखी कितीकांचा शोध लागेल हेंही सांगवत नाहीं. मग या गोष्टीवरून ही एक मोठी शंका प्राप्त होत नाहीं काय, कीं जर वर सांगितल्या पांचांचींच फळें सगळ्या जगास बाधतात तर या बाकीच्या मंडळीचींही कां बाधूं नयेत ? पूर्वींच्या ज्योतिषांस न दिसले ह्मणून हे सर्व नवे ग्रह सगळ्याच्या राशीस लागायास चुकले असतील काय ? बाकीच्यांच्या प्रमाणेंच यांनींही शक्त्यनुसार जनास पीडा व सुख हीं दिलीं असतीलच. पण चमत्कार पहा कीं, गेल्या शंभर वर्षांपर्यंत पांचांची मात्र गणना होऊन बाकीची एवढी मंडळी धड जमेंत ना खर्चांत ! आणि यांखेरीज सूर्यमालेच्या आणखी दूर दूर कोंपऱ्यांत आजपर्यंत दृष्टि चुकावून जे कोणी बसले असतील ते निराळेच ! दुसरा आक्षेप असा कीं, आपली पृथ्वी ही ग्रहगणांतच मोडते ह्मणजे सूर्यमालेंत पहिला ग्रह बुध, दुसरा शुक्र, आणि तिसरी पृथ्वी होय. तेव्हां यावरून ध्यानांत येईल, कीं या गोलावरील लोकांस जसा बुधाचा, शुक्राचा, मंगळाचा धाक वाटतो त्याप्रमाणेंच वरील ग्रहावर रहाणाऱ्या लोकांसही (लोक असले तर)

आमच्या पृथ्वीचा धाक वाटत असेल. तेव्हां ज्योतिषांनीं गणित करतांना आपल्या पायांखालच्या ग्रहाचेंही फळ वर्तविलें पाहिजे! तें बाळगतां कामा नये.

आणखी असें पहा कीं, ग्रहांच्या गतीवर मनुष्यमात्राच्या सुखदुःखांचें जर अवश्य अवलंबन आहे, तर जो प्रकार एके देशांत आढळावा तोच सर्वत्रही आढळण्यांत यावा हें न्यायाच्या दृष्टीनें युक्त आहे कीं नाहीं? जर आहे, तर तसा प्रकार दृष्टीस पडतो काय? आमच्या देशांत जर बारावा बृहस्पति वाईट, अमुक स्थानीं असलेला मंगळ चांगला, तर तसेंच चोहोंकडेही लागू पडावें. पण निरनिराळ्या राष्ट्रांतील ज्योतिषविद्येचे प्रकार पाहिले तर ते सारखेच जमतील असें वाटत नाहीं. एका देशांत ज्या स्थानचा जो ग्रह इष्ट किंवा अनिष्टकारक मानला असेल त्याच स्थानचा तोच ग्रह दुसऱ्या देशीं विपरीत असेल. शिवाय वरील ग्रहांची सर्वांवर सारखीच दृष्टि असावी. एका मनुष्यास जर त्यांपासून पीडा झाली तर दुसऱ्यासही ती अवश्य व्हावयासच पाहिजे. पण असें कोठें आढळतें? एथें कोणाच्या राशीवर शनि महाराजांची स्वारी वळली कीं, त्यांच्या प्रीत्यर्थ लोहदान, तिलदान वगैरे हजारों धर्मकृत्यें केलीं तरी त्यांचा रोष कमी होत नाहीं; पण तीच स्वारी इंग्लंडांतल्या वगैरे मनुष्यांच्या बिलकुल वाटेस न जातां खुशाल आल्या वाटेनें चालती होते. तेव्हां या त्यांच्या पंक्तिप्रपंचाचें काय बरें बीज असावें? ज्या अत्युग्रग्रहानें प्रत्यक्ष शंकरावरही दोन तीन घटका आपला प्रभाव गाजविला, ज्याची दृष्टि लंकापतीच्या सिंहासनावर सारखी लागली असतां लवकरच चौदा चौकड्यांचें राज्य फडशा होऊन गेलें, त्याचेंच सामर्थ्य यःकश्चित् परद्वीपस्थ मनुष्यांवर चालू नये हें केवढें आश्चर्य! तेव्हां एकंदरींत 'भितऱ्यापाठी ब्रह्मराक्षस' ही म्हण मागील दोन लोकभ्रमांच्या संबंधानें जशी लागू पडते तशीच ती प्रस्तुतच्या संबंधानेंही पडते असें सहजच म्हणणें येतें.

७. आतां प्रस्तुत विषयाच्या तर्फेचें दुसरें प्रमाण जो प्रत्यक्ष अनुभव त्याविषयीं विचार करूं. हें प्रमाणही वरच्यासारखेंच प्रकृत विषयाचें खरें-पण सिद्ध करण्यास चांगलेंसें उपयोगी पडणार नाहीं हें सर्वांस स्वतःच्या प्रचीतीवरून बहुधा माहीत असेलच. पहा कीं, जन्मपत्रिका, वर्षफल, मुहूर्त, प्रश्न वगैरे जे ज्योतिष्यांचे भविष्यवादाचे अनेक प्रकार असतात यांतून सर्वांशीं बरोबर प्रत्ययास उतरलेला एक तरी सांपडतो काय?

अमुक अमुक गोष्ट अमुक अमुक वेळीं घडेल असें सांगितलें, आणि तिचा नेमका ठोका आला, असें दोन चारदा तरी झालेलें कोणाच्या ध्यानीं असेल ? अशा गोष्टी कदाचित् एकाद्या दुसऱ्या वेळीं झालेल्या फार तर कोणीं पाहिल्या असतील; पण ज्या अर्थी त्या नेहमीं न होतां एकाद्या दुसऱ्या वेळेसच काय त्या घडतात, त्या अर्थी त्यावर नियम बांधतां न येऊन त्या केवळ यदृच्छेनेंच घडल्या असें मानायाला नको काय ? अर्थात् असेंच मानलें पाहिजे; त्याशिवाय गत्यंतरच नाहीं. पण असें नसून, समजा कीं, पुढें होणाऱ्या गोष्टींचें ज्ञान होण्याचा मार्ग मनुष्यास सांपडला, तर त्यापासून केवढा उपयोग होईल बरें! सर्व मनुष्यांस, व विशेषतः राजकारणी पुरुषांस, तर अशा ज्ञानापासून आपलें केवढें हित करून घेतां येईल ! सध्यांच्या अज्ञान स्थितींत जसें करायाला जावें एक आणि होतें एक, दुसऱ्यास आपण मोठे युक्तीनें डावपेंच घालायाला जावें, आणि मधेंच कांहीं अकल्पित गोष्टी घडून आपल्याच तंगड्या आपल्या गळ्यांत याव्या, असे प्रकार भावी गोष्टींचें ज्ञान आपणास झालें असतां अगदीं टाळतां येतील हें उघड आहे. असो; तर याप्रमाणें भविष्यकाळाचें ज्ञान मनुष्यास अत्यंत हितावह होणारें आहे; आणि हें प्राप्त करून घेण्याचा एकादा खरा मार्ग जर आजपर्यंत कोणास उमगला असता, तर त्याच्या शोधार्थ लक्षावधि लोकांचे प्रयत्न सुरू झाले असते यांत अगदीं संशय नाहीं. पण प्रस्तुतच्या ज्योतिषविद्येसारखे जे कांहीं मार्ग चोहोंकडे प्रसिद्ध आहेत ते केवळ अनिश्चित होत; यास्तव त्यांच्यावर भोळे व भाविक अशा लोकांखेरीज कोणाचाही पक्का विश्वास जडत नाहीं. असो; एकंदरींत हें भविष्यज्ञान ईश्वरानें केवळ आपणाकडेच ठेवून तें मनुष्यास होण्याचा बिलकुल मार्ग ठेवला नाहीं हें फार चांगलें झालें असेंही आह्मी समजतों. कारण मनुष्याचा स्वभाव एकंदरींत पाहतां मोठासा सुधा आहे असें नाहीं; आणि त्यांतून वरील ज्ञान त्यास अनुकूळ झालें तर जगांत आणखी किती अनर्थ होतील हें सांगायाला नको ! सारांश, भविष्यकाळीं होणाऱ्या गोष्टींचें ज्ञान मनुष्यास होण्याचा अद्याप एकही मार्ग कोणास सांपडलेला नाहीं; आणि तो आजपर्यंत न सांपडला व पुढेंही कधीं सांपडूं नये यांतच एकंदर जगाचा निभाव आहे !

दुसरें प्रत्यंतर असें पहा कीं, ज्योतिषविद्येवरून पुढें होणाऱ्या गोष्टी जर सगळ्या बिनचूक कळतात तर मग इतर सामान्य मनुष्यांप्रमाणेंच ज्योति-

त्यांवरही संसारांतील संकटें कां गुदरतात? जर त्यांस ग्रहांच्या गतीवरून भावी संकटें अगोदर समजतात, व त्यांचा प्रतिकार कसा करावा हेंही जर त्यांस माहीत असतें, तर मग सर्व उपद्रवांपासून सर्व विपत्तींपासून वगैरे ते अगदीं मुक्त असावे कीं नाहींत? पण असा प्रकार कोठें तरी आढळतो काय? असो; तेव्हां या सर्व गोष्टींवरून एकंदरींत स्पष्ट दिसतें कीं, जोशांचा टोका वगैरे सर्व लोकांचीं बोलणीं केवळ भ्रांतिमूलक होत. मागें शकुनांच्या निबंधांत सांगितलेल्या नेप्च्यूनच्या गोष्टीप्रमाणें अज्ञान लोक फसले जातात इतकेंच काय तें; ह्मणजे जेवढ्या गोष्टी पटतात तेवढ्या मात्र घेऊन लोक त्यांवरून एकंदर सिद्धांत ठरवितात हीच त्यांची मोठी चूक असते. बाकी, जो मनुष्य प्रांजल बुद्धीनें पटलेली व न पटलेली अशीं दोन्हीही उदाहरणें घेऊन त्या दोहोंवरून सत्यासत्यत्वाचा निवाडा करूं पाहील त्याच्या ध्यानांत खरें तथ्य तेव्हांच आल्यावांचून कधींही राहणार नाहीं.

याप्रमाणें प्रस्तुत विषयावर दोन प्रकारचीं प्रमाणें दाखविलीं. त्यांवरून आमच्या समंजस वाचकांची खात्री झाल्याविना राहणार नाहीं, कीं लहान मोठ्या सर्व कृत्यांत तिथि, वार, नक्षत्रें वगैरेचीं फलें पाहण्याचा जो प्रचात आपल्या देशांत आज हजारों वर्षें चालत आलेला आहे तो केवळ भ्रमात्मक होय. अंतरालांत जे लक्षावधि गोल फिरताहेत त्यांच्या अनादिसिद्ध गतीचा आणि आपल्या या यःकश्चित क्षुद्र गोलावर कीटवत इतस्ततः संचार करणारे जे आपण मानवी प्राणी यांच्या संसारकृत्याचा परस्परसंबंध असावा हें मुळींच संभवत नाहीं. जगन्नियंत्याच्या इच्छामात्रेंकरून प्रेरित होत्सातीं वरील तेजें आपआपलीं नियतकालीक परिभ्रमणें अंतरिक्षांत परिपूर्ण करीत आहेत; त्यांस या आमच्या लहानशा जगांत आमच्यामतें मोठमोठ्या उलाढाली झाल्या तरी त्यांशीं काय कर्तव्य आहे? तीं कोणीकडे आणि आह्मी कोणीकडे! आमचे मल्हारराव महाराज पदच्युत होऊन जन्मकैदेंत गेले, किंवा उद्यां रशियन लोकांनीं सगळा अफगाणिस्थान सर केला, तर या गोष्टींचा पुकारा सगळ्या जगभर करण्यास शनीनें अमुक स्थानीं यावें, गुरूनें अमुक अमुक जागा पतकरावी, सूर्यानें आपल्याभोंवतीं खळें उत्पन्न करावें, किंवा एकाद्या धूमकेतूनें उदयास यावें, एवढी खटपट वरील स्वस्थ पदार्थांस करण्याची काय गरज आहे? बडोद्याचे गायकवाड, सेंट पीटर्सबर्गचे झार यांची

कीर्ति सूर्यमालेंतील दूरदूरच्या ग्रहांपर्यंतही गेली आहे काय? आणि एकाचा अपकर्ष व दुसऱ्याचा उत्कर्ष या गोष्टी एकंदर सृष्टीच्या मानानें पाहतां एवढ्या महत्त्वाच्या आहेत काय, कीं खरें खोटें दुःखप्रदर्शन किंवा आनंदप्रदर्शन करण्यास एथें जसे जागोजाग लोक जमतात त्याचप्रमाणें आकाशांतही चोहोंकडे एकदम मोठा हाहाकार व्हावा! आह्मांस तर वाटतें कीं, एकंदर विश्वाच्या मानानें पाहतां आमच्या पृथ्वीवरील मोठमोठे बादशहा व सार्वभौम राजे यांची योग्यता आणि मधाच्या पोळावर स्वामित्व गाजविणारी राणी माशी किंवा वारुळाची नायकीण राणी मुंगी यांची योग्यता या परस्पर सारख्याच होत! ज्या काळीं पृथ्वी ही अवघ्या विश्वाचा मध्य असून सर्व ग्रहगण व ज्योतिर्गण तिच्या भोंवतीं सतत भ्रमण करताहेत अशी एकंदर जगाची समजूत होती, व सूर्यचंद्रादि खस्थ पदार्थांचें वास्तविक परिमाण माहित नसून सूर्यमालेची यथावत् स्थिति लोकांत प्रगट झालेली नव्हती. तेव्हां वरील कल्पना होत्या हें ठीकच होतें. त्या वेळेस जग काय तें आपली पृथ्वी मात्र मानली असून बाकीचे सर्व खस्थ पदार्थ हे केवळ तीवर राहणाऱ्या प्राणिमात्राकरतां व विशेषतः मनुष्याकरतांच निर्माण केले आहेत असें सर्व समजत असत.* जसें एकादें मोठें मंदिर असावें आणि त्यांत हजारों पदार्थ कांहीं उपयोगाकरितां व कांहीं केवळ शोभेकरतां ठेवले असावे, त्याचप्रमाणें आपली पृथ्वी ही देवानें मनुष्याकरतां बांधलेला एक मोठा महाल असून सूर्यचंद्र हे त्यास प्रकाश देण्याकरतां व नक्षत्रें, ग्रह वगैरे हे केवळ शोभेकरतां उत्पन्न केले आहेत अशी पुरातन काळच्या लोकांची समजूत होती. अशा वेळीं पृथ्वीवरील मोठमोठे राजे यांचें एकंदर विश्वाच्या मानानें

* ज्योतिषशास्त्रासंबंधी पुष्कळ चमत्कारिक नवे शोध करून ते पूर्णत्वास आणल्याचा मान जरी ख्रिस्ती लोकांकडे आहे, तरी त्यांच्या 'पवित्र शास्त्रां'त या शास्त्राचें अज्ञान भरपूर दिसून येतें. यास वरील 'ईश्वरप्रणीत शुभवर्तमाना-'ची पहिली ओवीच मोठें प्रमाण आहे. ही ओवी पुष्कळांस माहीत असेलचः— "ईश्वरानें आधी आकाशें व पृथ्वी यांस उत्पन्न केलें."

वरील शब्द भाषांतरकाराच्या महाराष्ट्रभाषानिज्ञतेचें जसे उत्कृष्ट प्रमाण होत, त्याप्रमाणेंच 'पवित्र शास्त्रा'चा खरा कर्ता कोण हेंही ते साऱ्या जगास विदित करीत आहेत! या दिल्लीदरवाज्यावरून आंतील इमारतीची बळकटी सर्वांस दिसून येईलच!!

( त्या वेळेस एकंदर विश्व ह्मणजे पृथ्वीच कायती ! )—मोठेंच महत्त्व असून त्यांस घडलेल्या इष्टानिष्ट गोष्टींचीं चिन्हें सगळ्या सृष्टींत दिसावीं हें साहजिक होतें; ह्मणजे प्राचीन महाकाव्यांतून जी वरील प्रसंगीं उत्पातादिकांचीं वर्णनें असतात तीं त्या वेळच्या लोकांस तशीं वाटावीं हें सहजच आहे. पण हल्लींच्या काळीं वरील मान सगळें अगदींच फिरून गेलें आहे. ह्मणजे सूर्य व त्याच्या भोंवतालचें आपली पृथ्वी आदिकरून ग्रहाचें लटंबर याचीही एकंदर विश्वांत कोणीकडच्या कोणीकडे मुळींच दाद लागत नाहीं. समुद्रावरील वाळवंटांतला एकादा खडा नाहींसा झाला असतां जसा तो कोणास कधींही उमगला जाणार नाहीं, त्याचप्रमाणें अवघ्या विश्वाच्या एकंदर आवाढव्य विस्तारांतून आमची सूर्यमालाची माला अजीबात गडप जरी झाली तरी सुद्धां कांहीं समजण्यांत येणार नाहीं असें ज्योतिषवेत्ते ह्मणतात. मग एवढ्या प्रचंड सूर्याची व शनि, गुरु यांसारख्या शंभर ग्रहांची ज्या विश्वांत इतकी योग्यता तेथें आमच्या एवढ्याशा एका गोलाला कोण विचारतो ! आणि सरतेशेवटीं या यःकश्चित गोळ्यावर तीन साडेतीन हाताची आपली भव्य मूर्ति मिरविणारे, ‘ स्टार ऑफ इंडिया ’ नांवाचे दहा पांच चांद अंगावर चमकवणारे आणि ‘ नजर रखो ’ ह्मणून मोठ्या थाटांत ललकारत जाणारे, अशा आमच्या सेना खासखेलांची किंवा तशीच ह्मार महाराजांची स्वारी मनांत आणावी;—ह्मणजे ज्यांचें शुभाशुभ दाखविण्याकरितां नक्षत्रांनीं, ग्रहांनीं, धूमकेतूंनीं वगैरे नेहमीं जपत असलें पाहिजे ! त्यांचा खरोखर पाहतां एकंदर सृष्टींत केवढा वडिवार आहे याची कल्पना वाचकांच्या मनावर चांगली ठसल्याशिवाय राहणार नाहीं.

वरील प्रतिपादनावरून आमच्या सर्व सुज्ञ वाचकांच्या मनांत येईल कीं, या भूतलावर क्षणमात्र इतस्ततः संचार करणारा जो कीटकप्राय मनुष्य त्याच्या भातुकलींतल्या सारखा चुटपुटत्या गृहकृत्यांचा आणि आकाशांत फिरणाऱ्या ग्रहनक्षत्रादिकांचा बिलकुल संबंध नाहीं. यास्तव त्यांच्या योगायोगांचा त्यानें हर्षही मानूं नये व विषादही मनांत वाळगूं नये. गिरणींत काम करणाऱ्या मनुष्याचें बरें वाईट होणें हें जसें भोंवतालीं फिरणाऱ्या शेंकडों चाकांच्या गतीवर नाहीं, किंवा घड्याळाच्या तबकडीवरून जाणाऱ्या मुंगीचें शुभाशुभ लंबकाच्या हेलकाव्यावर किंवा आंतील चक्राच्या फिरण्यावर नाहीं, त्याचप्रमाणें मनुष्याची या भूगोलावर

स्थिति आहे. आकाशांत फिरणारीं तेजें हीं त्याच्या कल्याणाविषयीं अगर अकल्याणाविषयीं केवळ उदासीन होत. एथील लोकांस शनीचा एवढा निरंतर धाक वाटतो, पण गेल्या वर्षी कांहीं लोक तोफेच्या गोळ्यांत बसून जसे चंद्रावर गेले होते तसेच पुढें एकादे वेळेस जर कोणी शनीवर जातील, तर तेथील लोकांस आमच्या विलक्षण व निरर्थक भयाचें मोठें आश्चर्य वाटेल; व आह्मी जसें त्यांच्या गोलास भितों तसेंच तेही कदाचित् आमच्या ग्रहाच्या वक्रदृष्टीस थरथरां कांपत असतील ! ! असो; तर या सर्व गोष्टी मनांत आणल्या असतां आमच्या वाचकांची खात्री होईल कीं, ज्योतिषविद्येवर आजपर्यंत जो सर्व लोकांचा विश्वास पक्का जडला असे त्यास त्यांचें अज्ञान व बुद्धीचा अपक्कपणा हींच केवळ कारणें होतीं. हीं आतां पुष्कळांच्या ठायीं दूर झालीं असल्यामुळें त्यांचे ठिकाणीं मागील काळचा अज्ञानजन्य विश्वास अजून राहावा हें मुळींच संभवत नाहीं.

९. एथवर मुख्य विषयाचा बहुतेक विचार झाला. आतां आणखी एक दोन गोष्टींविषयीं लिहून हा निबंध आटपतों. एक ही कीं, वर प्रस्तुत विद्येचें आह्मीं खंडन केलें यावरून तिचें मूळचें प्रणयन करणारे व तिची पुढें वृद्धि करणारे जे होऊन गेले ते केवळ मूर्ख होते किंवा लोकांस फसवण्याच्याच हेतूनें त्यांनीं वरील ग्रंथ लिहिले असें ह्मणण्याचा आमचा बिलकुल रोख नाहीं. उलटें आह्मीं मागें एकदां सांगितलेंच आहे कीं, प्रस्तुत शास्त्राच्या उदयास ज्ञानप्राप्तीची मनुष्याची स्वाभाविक उत्कंठा हीच मुख्यतः कारण झाली; आणि तिचे योगानें पहिल्या पहिल्यानें जरी भ्रमाचा मात्र प्रसार झाला तरी पुढें त्या भ्रमांतूनच खऱ्या शास्त्राचा प्रादुर्भाव झाला. यास्तव हल्लींच्या ज्ञानसंपन्नतेच्या काळीं जरी वरील शास्त्राचें विलक्षणत्व व असमंजसत्व पाहून आपणास हसूं आलें, तरी त्यापासून पुढें परिणाम कोणते झाले या गोष्टीवरच मुख्यत्वेंकरून लक्ष देऊन त्या व्यर्थ श्रम पावलेल्या शोधकांस आपण विशेष मानच दिला पाहिजे. दुसरें असें ही आपण लक्षांत आणावें कीं, ते ज्या वेळीं जन्मास आले त्या वेळेस जग मूळच्या बाल्यावस्थेंतून नुकतेंच वर येऊं लागलें होतें, यास्तव हल्लींच्या इतका ज्ञानाचा प्रसार त्या वेळेस झाला नसल्याकारणानें वर वर्णिलेला भ्रम मनास जडणें हें केवळ साहजिकच होतें. पहा कीं, सूर्याच्या व चंद्राच्या ग्रहणांची उपपत्ति ज्यास माहीत नाहीं त्यास त्या दोहोंचीं बिंबें एकाएकीं काळीं ठिक्कर पडतांना पाहून मोठें आश्चर्य व भय वाटणार नाहीं काय ?

त्यास वाटेल कीं, सृष्टीचा नेहमींचा क्रम बदलून हा एवढा उत्पात एकाएकीं कशामुळें झाला असावा बरें? सगळ्या राष्ट्रावर ईश्वराचा क्षोभ होऊन त्याचें दर्शक तर हें नसेल ना! कोलंबसानें अटलांटिक महासागरावर पहिल्यानें धाड घातली असतां होकायंत्राचा कांटा एकाएकीं उत्तरेकडचा दक्षिणेकडे वळतांना पाहून त्याच्या खलाशांस भय वाटलें तें जसें साहजिक होतें तसाच वरील प्रकार होय. या चमत्काराचें अजूनही कांहींच कारण उमगलें नाहीं; पण पुढें कांहीं काळानें जर तें उमगलें तर कोलंबसास व त्याच्या खलाशांस विनाकारण भय वाटल्याबद्दल हसणें हें त्या वेळेस जसें असमंजस होईल, किंवा सध्यां तें करणें हा जसा मूर्खपणा होय, तसाच वरचा प्रकार आहे. वरील ग्रहणांचें किंवा होकायंत्राचा कांटा ढळल्याचें आपणास सध्यां जें भय वाटत नाहीं त्याचें कारण वरील प्रकार हळू हळू अांगवळणी पडल्यासारखे झाले आहेत हें होय; व सर्वांस समजून आलें आहे कीं, यांपासून कांहीं होत नाहीं! पण असे चमत्कार ज्या लोकांस पहिल्यानेंच दृष्टीस पडतात ते अत्यंत भयचकित होऊन जात असतील यांत कांहीं नवल नाहीं. दुसरें उदाहरण धूमकेतूंचें पहा. यांचें भ्रमण सरासरी अनिश्चितच आहे; व त्यामुळें यांच्या कक्षा सुमारानेंही काढण्यास मोठ्या पटाईत ज्योतिष्यांसही मोठीच मारामार पडते. तेव्हां यांचें दर्शन आकाशांत जें कधीं कधीं घडतें तें अर्थातच अकल्पित घडून त्यांचें वास्तव्यही अनिश्चितच असतें. शिवाय यांचा आकारही बाकीच्या स्वस्थ पदार्थांहून अगदीं निराळा व तऱ्हेवाईक असल्यामुळें हे दिसूं लागले न लागले कीं सर्वांचें लक्ष्य यांच्याकडे लागतें. मग काकतालीयन्यायानें त्या देशांत किंवा आसपासच्या देशांत एकादा भयंकर उत्पात त्याच वेळेस सुरू असला किंवा पुढें लागलींच झाला कीं, लागलींच सर्वांची सहजच कल्पना बसते कीं, शेंडेनक्षत्र या उत्पाताचें सूचक होय. परस्पर केवळ असंबद्ध असणाऱ्या गोष्टींचाही असा जम बसवणें हा मनुष्याच्या मनाचा एक धर्मच होय; यास इंग्रेजींत 'आसोशिएशन् ऑफ् ऐडियाज्' [ कल्पनांची संगति ] असें ह्मणतात. ही संगति एकदा झाली ह्मणजे विरुद्ध प्रमाणें चांगलीं बलवत्तर दृष्टीस पडल्याखेरीज ती कधींही मोडली जात नाहीं; ह्मणजे मनानें घेतलेल्या कारणांचा व कार्यांचा असंबंध पुष्कळदा दृष्टीस पडल्याखेरीज वरील ग्रह नाहींसा होत नाहीं. असो; तर याप्रमाणें सूर्यचंद्रांचीं ग्रहणें व शेंडेनक्षत्रें हीं कधींमधीं एकादे वेळेसच काय तीं

दृष्टीस पडणारीं असल्यामुळें वरच्यासारखी खोटी कल्पनासंगति लोक जी करीत ती स्वाभाविक करीत. समजा कीं, दररोज रात्रीं एक दोन शेंडीं नक्षत्रें उगवावीं असें जर असतें; किंवा गुरुवार, शनिवार वगैरे* जसा प्रकार आहे त्याप्रमाणेंच या आपल्या पृथ्वीवरही दररात्रीं चंद्रग्रहण असून सूर्यग्रहणेंही महिन्यांतून दहा पांचदा व्हावीं असें जर असतें, तर बिचाऱ्या शेंडे नक्षत्रावरचा व राहुकेतूंवरचा आरोप केव्हांच उडून जाता. किंबहुना आरंभींच जडताना! आपला चंद्र कधीं अर्धा असतो, कधीं सगळा होतो, कधीं मुळींच नाहींसा होतो, याचा जसा विलक्षणपणा कोणास कधींही वाटला नाहीं,—कां कीं, तो सृष्टिक्रमच होय अशी तेव्हांच एकदम मनुष्याची समजूत होऊन बसली—त्याचप्रमाणें वरील नक्षत्रांच्या लांब शेपटांचा व चंद्रसूर्यांवर अकस्मात् येणाऱ्या कालिमेचा कोणासही मुळींच आचंबा वाटता ना! 'अतिपरिचयादवज्ञा' 'अति परिचय झाल्याच्या पोटीं अवज्ञा उत्पन्न होते' ही ह्मण लौकिकांत जशी खरी आहे तशीच चोहोंकडेही आहे. धूमकेतूंची स्वारी कधींमधीं एकादे वेळेस वीस पंचवीस वर्षांनीं दृष्टीस पडते, व पुनः प्रस्थानही लवकरच करते, त्यामुळें त्यांची साऱ्या दुनियेभर जी मानमरातब राहते ती पुनः—पुनः आगमन केलें तर अगदीं राहणार नाहीं. इसापनीतींतील बेडकांच्या गोष्टीप्रमाणें त्यांचीही गत होईल. ह्मणजे ज्युपिटरानें आकाशांतून लांकडाचा ओंडा खालीं टाकला असतां तो पाण्यावर मोठ्यानें आदळल्यामुळें सगळे बेडूक जसे पहिल्यानें अगदीं चपापले, व कोणी हूं का चूं सुद्धां न करतां कांहीं वेळ आपआपल्या जागीं स्तब्ध होऊन राहिले; पण त्यांचा राजा कांहींच हालचाल करीनासें पाहून सर्व जसे जसे हळू हळू त्याच्या जवळ आले–त्याच्या अंगावर चढूं लागले–त्याशीं खेळूं लागले–आणि लवकरच सर्वांस त्याच्या अतिशय मट्ठपणाचा अगदीं त्रास येऊन त्यास कोणीच

---

* गुरूला चार चंद्र (उपग्रह) आहेत. यास्तव त्यांच्या व सूर्याच्या मधोमध एका केंद्रांत आलेला असा त्यांपैकीं कोणी ना कोणी तरी असतोच. यामुळें दररात्रीं ह्मणजे नेहमीं (कारण रात्र ही कोठें ना कोठें तरी असायाचीच!) गुरूवर चंद्रग्रहणाचा योग असतो. हीं ग्रहणें खलाशांस फार उपयोगीं आहेत, व तीं त्यांच्या पंचांगांत नेहमीं दाखल केलेलीं असतात. याच गुरूच्या चंद्रग्रहणांवरून दर्शनानुशासनांतील एक मोठी गोष्ट सिद्ध झाली. ती गोष्ट प्रकाशाचा प्रसरणधर्म व गति ही होय. शनीला तर आठ उपग्रह आहेत.

विचारीतनासे झाले, त्याचप्रमाणें धूमकेतूचीही दुर्दशा झाली असती. असो; तर याप्रमाणें वरील अंतरिक्षांतील चमत्कार क्वचित् होणारे असल्यामुळें त्यांकडे लोकांचें लक्ष्य फार लागे. आणि या पृथ्वीवर घडणाऱ्या घडामोडींचें सूत्र सगळें आकाशांत आहे अशी कल्पनाही मनुष्यास सहज होण्यासारखी असल्यामुळें ती सर्वांनीं उचलून प्रस्तुत शास्त्राचा जो सार्वत्रिक प्रचार आढळतो तो चोहोंकडे सुरू झाला असावा असें अनुमान होतें. तर याप्रमाणें ज्योतिषविद्या ज्यांनीं पहिल्यानें प्रवर्तविली त्यांनीं तसें करण्यांत आपला मूर्खपणा प्रगट केला किंवा जगास फसवण्याचा मार्ग काढला असें ह्मणणें अगदींच शोभत नाहीं.

१०. आतां सरते शेवटीं प्रस्तुत भ्रमरूप शास्त्रांतून उद्भवलेलें जें खरें ज्योतिष त्याची योग्यता व उपयोग यांविषयीं थोडेंसें लिहून हा विषय आटपतों. प्रस्तुत निबंधाच्या आरंभीं लिहिलेंच आहे कीं, या शास्त्रापासून कवि, तत्त्वज्ञ, व ईश्वरपरायण अशा तिन्ही प्रकारच्या मनुष्यांस अत्यंत आनंद होण्यासारखा आहे. तो असाः—पहिल्यानें कवि. कवींचा विषय ह्मटला ह्मणजे कल्पनाशक्ति होय, ह्मणजे चित्तास जेणेंकरून चमत्कृति भासेल त्यांत ते रममाण होतात. ही चमत्कृति ज्योतिषशास्त्रांत जी आहे ती त्या शास्त्राचा विषय जें विश्व त्यासारखीच केवळ अपार आहे! प्रत्येक राष्ट्राच्या कवींनीं सूर्यचंद्रादि स्वस्थ पदार्थांचीं वर्णनें किती निरनिराळ्या प्रकारानीं केलीं आहेत, त्यापासून उपमारूपकादि भांडार त्यांस किती ध्यावयास सांपडतें; व हिंदु, ग्रीक वगैरे राष्ट्रांच्या पुराणग्रंथांतून वरील तेजांस दैवतें कल्पून त्यांविषयीं किती चमत्कारिक कथा लिहिलेल्या आहेत, हें सर्व जो मनांत आणिल त्यास प्रस्तुत शास्त्राचा कवितेशीं किती निकट संबंध आहे तो चांगला लक्ष्यांत आल्यावांचून राहणार नाहीं. त्यांतून अलीकडे तर या शास्त्रांत जे शेंकडों नवे नवे शोध झाले आहेत व होत आहेत त्यांच्या योगानें तर कवींच्या कल्पनाशक्तीस रंजवण्याचें साधन याजमध्यें किती ज्यास्त आलें आहे! गुरूचे चंद्र, शनीचे उपग्रह व कडें, सूर्यावरचे डाग, धूमकेतूंचा लक्षावधि कोस लांबवर पसरलेला प्रकाशाचा झोत, इत्यादिकांचें दृग्यंत्रद्वारा प्रत्यक्ष दर्शन झालें असतां कोणास मौज वाटणार नाहीं! त्याप्रमाणेंच सूर्यमालेची एकंदर अवाढव्य रचना–तींतील ग्रहांचें आकारमान, मनास थक्क करून टाकणारा त्यांचा वेग, त्यांचीं अमर्याद अंतरें, कधीं न चुकणारी अशी सुयंत्र गति; हें सर्व मनांत आणलें असतां

केवढा चमत्कार वाटतो! सारांश, आडिसन् यानें आपल्या सर्व प्रसिद्ध निबंधांत 'चित्तचमत्कृती' चे जे तीन हेतु प्रतिपादन केले आहेत, एक महत्त्व, दुसरें सौंदर्य, आणि तिसरी विचित्रता-त्या सर्वांचा प्रस्तुत विषयांत पूर्ण समावेश होत असून तिन्हीही यांत अनंतत्वानें राहताहेत! असो; आतां दुसरे तत्त्वज्ञ ह्मणजे वस्तुमात्राचा तत्वतः शोध करणारे. अशांसही प्रकृत शास्त्रांतील सिद्धांत अत्यंत विस्मयास्पद वाटतील हें उघडच आहे. लोकांस स्वतःसिद्ध वाटणाऱ्या गोष्टी, किंबहुना प्रत्यक्ष इंद्रियजन्य अनुभव यांसही खोटी करणारीं जीं सूर्याची स्थिरता, पृथ्वीचें भ्रमण, तिची अंतरालांत निराधार स्थिति, पदार्थमात्राचें आकर्षण करण्याची तिच्या अंगची शक्ति,—इत्यादि ज्योतिषांतील प्रमेयें त्यांचें सोपपत्तिक ज्ञान होऊन संपूर्ण सृष्टीचें नव्या ज्ञाननेत्रानें जेव्हां मनुष्य अवलोकन करूं लागतो तेव्हांचा त्याचा अधिकार काय सांगावा! मोठ्या उंच पर्वताच्या शिखरावर उभा राहिलेल्या मनुष्याची नजर जशी खूप लांबवर पोंचून त्याचा दृक्प्रदेश वाढतो त्यासारखीच मनाच्या संबंधानें पाहतां वरील मनुष्याची स्थिति होय. ह्मणजे त्याच्या ज्ञाननेत्राचा टप्पा सृष्टीच्या सीमेपर्यंत जाऊन पोंचतो असें ह्मणावयास चिंता नाहीं! तसेंच सृष्टीचे अनेक गुप्त व्यापारही त्यास कळून सामान्य जनांस अज्ञानास्तव ज्या गोष्टींचें खरें स्वरूप कांहींच कळत नाहीं, किंवा ज्यांविषयीं विचार करूं गेले असतां त्यांची बुद्धि अगदीं गोंधळून जाते, किंवा ज्याचें त्यांस अत्यंत भय वाटतें;* त्या सर्वांचें यास सोपपत्तिक ज्ञान झालें असतां मुलांचें एकाद्या गोष्टीविषयीं चोज किंवा

---

* सूर्य आकाशांतून एकाएकीं नाहींसा झाला असतां अजाणत्या लोकांस केवढें भय वाटण्यासारखें आहे! याचें उदाहरण ग्रीसच्या इतिहासांतील एथें सांगतों. आथेन्स् आणि स्पार्टा या संस्थानांची लढाई चालली असतां एकदा असें झालें कीं, पहिल्या संस्थानानें दुसऱ्यावर चालून जाण्याकरितां एक मोठें आरमार तयार केलें. पण तें आतां निघणार इतक्यांत सूर्यास ग्रहण लागलें. त्याच्या योगानें अत्यंत भयभीत होऊन मुख्य गलबतावरील नाखुदा हातांत सुकाणू धरीना. तेव्हां मागील जहाजावर पेरिक्लीज् होता, त्यानें त्याच्याकडे जाऊन त्याच्या डोळ्यांवर आपला झगा घातला, आणि ह्मटलें, "यांत तुला कांहीं भयंकर दिसतें काय?" नाखुदा ह्मणाला, "नाहीं." मग पेरिक्लीज ह्मणाला, "अरे, मग यांत आणि या ग्रहणांत रे काय भेद आहे?—इतकेंच ना, कीं माझ्या झग्याहून फार मोठा पदार्थ तुझ्या दृष्टीआड आला आहे!"

बागुलबोवाचा धाक पाहून वयस्क मनुष्यास जसें हंसूं येतें त्याप्रमाणेंच यासही होतें. असो, पण हें सर्व तरी वरील शास्त्र शिकणारांविषयींच झालें. त्या शास्त्रांत नवे नवे शोध करून त्याचें गुरुत्व ज्यांनीं आपणाकडे घेतलें त्या महाबुद्धिमान् पुरुषांचें भाग्य तर काय सांगावें! थेल्स् नामें मागें सांगितलेल्या ग्रीक पंडितानें इ० स० च्या पूर्वी ५८४ व्या वर्षाचें * खग्रास सूर्यग्रहण वर्तवून तें जेव्हां लोकांच्या बरोबर प्रत्ययास उतरलें असेल तेव्हां त्याच्या बुद्धिसामर्थ्याचा लोकांस केवढा अचंबा वाटला असेल व त्यास स्वतः केवढा हर्ष झाला असेल! ग्यालिलियोनें नवी दुर्बीण स्वतः तयार करून आकाशाचें जेव्हां पहिल्यानें सीमोल्लंघन केलें, व पहिल्याच तडाक्यास गुरूचे उपग्रह, शनीचें कडें, सूर्यबिंबाचे डाग, चंद्रावरील पर्वत, † ही लूट भूलोकास आणली, तेव्हां त्याच्या चित्तास केवढा उल्हास झाला असेल! अशीच केप्लरची गोष्ट. ग्रहांच्या गतींविषयीं सिद्ध करून दाखविलेले तीन नियम याच्या नांवावर ज्योतिषशास्त्रांत प्रसिद्ध आहेत. यांतील प्रत्येकाची सिद्धता करण्यास यास वर्षाचीं वर्षें सतत खपावें लागलें. यांच्या योगानें ज्योतिषास किती पूर्णत्व आलें हें त्या शास्त्राच्या अभिज्ञांस चांगलें माहीत आहे. असो; या ज्योतिष्यानेंही वरील सिद्धांत पक्के ठरले असतां जो आनंद प्रदर्शित केला त्याचे उद्गार त्याच्या चरित्रांत सांपडतात. या आनंदभरांत यानें आपणास 'आकाशाचा नियंता' असें म्हटलें, व हा किताब आजपर्यंत तसाच त्याच्या नांवाबरोबर चालत

---

* या ग्रहणाचें उलट गणित करतां हें वरील वर्षाच्या मे महिन्याच्या २८ वे तारखेस झालें असें समजतें!

† या पर्वतांस उद्देशून मिल्टन कवीनें आपल्या महाकाव्याच्या पहिल्या सर्गांत म्हटलें आहे:—

——His ponderous shield.
Ethereal temper, massy, large and round,
Behind him cast; the broad circumference
Hung on his shoulders like the Moon, whose orb
Through optic glass the Tuscan artist views
At evening from the top of Fesole,
Or in valdarno to descry new lands,
Rivers or mountains in her spotty globe.

आला आहे. पण या सर्वांहूनही मोठी गोष्ट झटली ह्मणजे सर ऐझाक् न्यूटन् याची. हा एके दिवशीं बागेंत बसला असतां एक फळ झाडावरून खालीं पडतांना पाहून तेवढ्याशा गोष्टीवर त्यानें केवढा विभु रचला हें सर्वांस विदित आहेच. ज्या गुरुत्वाकर्षणाच्या नियमावर विशेषेंकरून त्याची कीर्ति आजपर्यंत चालत आली आहे व पुढेंही जगाचा अंत होईपर्यंत चालत राहील त्याची सिद्धता पुष्कळ वर्षें गणित करून जेव्हां त्यास सांपडली, व त्यास हवे होते तसे आंकडे त्या गणितांत क्रमाक्रमानें येऊं लागले,—तेव्हां असें सांगतात कीं, त्यास इतका आनंद झाला व कंपस्वेदादि अष्टभाव प्रकट होऊन इतके प्रबळ झाले, कीं त्याच्यानें पुढें गणित करवेना ! तेव्हां तें टाकून देऊन आपल्या एका मित्राकडून त्यानें तें पुरें करविलें !

आतां सरतेशेवटीं एक मात्र भाग राहिला. तो हा कीं, प्रस्तुत शास्त्राच्या अध्ययनानें व मननानें मनुष्याच्या ठायीं आस्तिक्य उत्पन्न होऊन जगत्कर्त्या परमेश्वराच्याठायीं भक्ति वृद्धिंगत होते. पहिल्यानें आस्तिक्य जें उत्पन्न होतें तें असें कीं, तो एवढी अपार सृष्टि आपणाभोंवतालीं पसरलेली जेव्हां पाहतो, व तिचा व्यापार आज युगानुयुगें अस्खलित व सुयंत्र चाललेला जेव्हां पाहतो, तेव्हां एवढें आडंबर कोणी कर्त्याशिवाय खास उत्पन्न झालें नाहीं, व एवढी राहटी जी आज अनंत वर्षें चालली आहे ती कोणी नियंत्याखेरीज खचीत चालली नाहीं, अशी त्याच्या मनाची पक्की खात्री होऊन जाते ! एकादी टोलेजंग व सुशोभित इमारत एकाद्या वालुकामय व निर्जन प्रदेशांत एकाद्यानें पाहिली असतां जी त्यास कल्पना होईल तीच वरील मनुष्यास होते; आणि ज्यानें एवढी भव्य व अबाढव्य रचना केली त्याचें सामर्थ्य व चातुर्य किती असावें असें त्याच्या सहजच मनांत येऊन तो थक होऊन जातो ! ही एक पहिली गोष्ट झाली ह्मणजे सर्व धार्मिकपणाचें मूळ जी वरील आस्तिक्यबुद्धि ती वर सांगितल्याप्रमाणें प्रस्तुत शास्त्रानें मनुष्याच्या मनांत दृढ होते. नंतर दुसरी गोष्ट परमेश्वराचे ठायीं प्रीति व भक्ति या दोन्ही वृत्तिही सृष्टीचें लेशमात्रही अवलोकन लक्ष्यपूर्वक केलें असतां सर्व सुज्ञ मनुष्यांच्या हृदयांत उत्पन्न होणाऱ्या आहेत. जसें मूल मोठें होऊन त्यास जाणतेपणा येऊं लागला असतां आपल्या मातापितरांनीं आपलें लालनपालन कसें केलें, आपणावर आलेले किंवा येऊं पाहणारे दुःखप्रसंग कसे टाळले, वगैरे गोष्टी त्यास

कळूं लागतात, व त्या मनांत येऊन त्यांची जन्मसिद्ध व सहवासरूढ प्रीति व भक्ति ह्या वृद्धिंगत होतात; त्याचप्रमाणें जगत्कुटुंबी जो परमेश्वर त्यानें संपूर्ण सृष्टीच्या रक्षणार्थ व सुखार्थ ज्या हजारों लाखों तजविजी व युक्ति करून ठेवल्या आहेत;—ज्या सृष्टिविषयक प्रत्येक शास्त्राच्या वृद्धी-बरोबर अधिकाधिक उदयास येत चालल्या आहेत व अशाच पुढेंही अनंतकालावधि अवश्य येत जातीलच—त्या सर्व मनांत आणल्या असतां दुराग्रही व मूर्ख अशा लोकांखेरीज सर्वांच्या मनांत वरील दोन वृत्ति अवश्य उत्पन्न होतीलच होतील; आणि जोंपर्यंत हें चराचर विश्व त्यांस दृष्टिगोचर होत आहे तोंपर्यंत त्या कशानेंही ढळणार नाहींत हें उघड आहे!

०

हें पुस्तक खालीं लिहिलेल्या ठिकाणीं विकत मिळेल.

इंडियन प्रिंटिंग प्रेस कांदेवाडी लेन-गिरगांव.

डी. व्ही. साधले आणि कंपनी-कालिकादेवीरोड.

व्ही. एम. वाळवेकर आणि कंपनी-रामवाडी मुंबई.

पुरंदरे आणि कंपनी-माधवबाग.